# ‘त्या’ वाहनचालकांना टोलचा परतावा मिळणार



**मुंबई** : गॅस टँकर अपघातानंतर मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक ३२ तास विस्कळीत झाली होती. वाहने तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून एक्सप्रेस वेवर रांगा लागल्या असतानाही वाहनांकडून पथकर वसूल करण्यात आला होता. अखेर आता अपघातानंतरच्या ३२ तासांच्या कालावधीत वसूल करण्यात आलेला पथकर वाहनधारकांना परत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यास मान्यता मिळाल्यानंतर तब्बल १.२ लाख प्रवाशांना सुमारे ५.१६ कोटींचा टोल परतावा देण्याचा येणार आहे. हा परतावा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)मार्फत देण्यात येणार असून येत्या काही दिवसांत संबंधित वाहनचालकांच्या फास्टॅग खात्यामध्ये थेट जमा केला जाणार आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २१७
www.ramprahar.com

◆ सोमवार, २३ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


खालापूर टोलनाक्याजवळ ट्रकचालकावर हल्ला/२

दारूमाफियाला पाठलाग करून पोलिसांनी पकडले/५

एमसीएच्या क्रिकेट स्पर्धेत रायगड संघाचा विजय/८


### आजपासून राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

# सामान्यांचे प्रश्न सोडवू -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार (दि. २३)पासून सुरू होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षांची पत्रकार परिषद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिवेशनात सामान्यांचे प्रश्न सोडवू, अशी ग्वाही दिली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या अधिवेशनात १५ विधेयके मांडली जाणार आहेत. ६ मार्चला मी अर्थसंकल्प मांडणार आहे. अजितदादांनी अर्थसंकल्पासाठी मोठी मेहनत घेतली होती, मात्र ते आज नाहीत. एखादी योजना शक्य नसल्यास ते स्पष्टपणे सांगायचे. अजितदादा कधीही बेशिस्त कारभार चालू देत नव्हते, त्यांनी केलेल्या सूचनांचे पालन आम्ही नक्कीच करू.

पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्राच्या माध्यमातून राज्याला मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे. महाराष्ट्राच्या निधीत २० हजार कोटींची वाढ झाली आहे. आता राज्याला ९८ हजार ३०६ कोटी रुपये निधी मिळणार आहे. आम्ही जी मागणी केली होती, ती मान्य होत आहे.

आपण विकसनशील अर्थव्यवस्था आहोत. यात विकास, कर्ज, दायित्व यांचा मेळ बसवावा लागतो. आम्ही कोणतीही योजना बंद करणार नाही. चांगला अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न करू, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्ही प्रिंटिंग मिस्टेक म्हणणारे नाही, तर करून दाखवणारे आहोत, असे सांगून विरोधक बोलतील तेव्हा त्याला उत्तर देऊ, असे म्हटले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी, लाडकी बहीण योजनेला अजितदादांनी निधी कमी पडू दिला नाही. अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद केली आहे, असे सांगितले.

# केंद्रीय सहकारमंत्री अमित शाहांच्या नेतृत्वाखाली बँकिंग क्षेत्राला नवी ऊर्जा -आमदार प्रशांत ठाकूर

### जीएस महानगर बँकेच्या कामोठ्यातील शाखेचे स्थलांतर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकाराची ताकद जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे ही काळाची गरज असून देशाचे सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली बँकिंग क्षेत्राला मिळालेल्या नव्या ऊर्जेमुळे हे क्षेत्र अधिक सक्षमपणे लोकसेवेसाठी सज्ज झाले आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.



जीएस महानगर को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कामोठे सेक्टर २१ येथील महाकाली निवास सोसायटीमध्ये स्थलांतरित झालेल्या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. २२) करण्यात आले. स्थानिक नागरिक, सभासद, ठेवीदार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा समारंभ झाला. त्या वेळी ते बोलत होते.

सहकार महर्षी सॉलिसिटर स्व. गुलाबराव शेळके यांनी कष्टकरी, शेतकरी आणि लघुउद्योजकांसाठी जीएस महानगर बँकेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेल्या या बँकेने छोट्या बचतींपासून मोठ्या उद्योगांपर्यंत पतपुरवठा करून अनेक कुटुंबांचा मार्ग मोकळा केला आहे.

बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कामोठे येथील स्थलांतरित शाखेच्या उद्घाटन समारंभाला नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत, पनवेल महापालिकेचे नगरसेवक दिलीप पाटील व रवींद्र जोशी तसेच सुनील गोवारी, जयेंद्र जोशी, संतोष जाधव, बँकेचे व्हाईस चेअरमन भास्कर कवाद, शाखा व्यवस्थापक सावकार वाफारे, किरण झंजाड, तुकाराम कदम, रवी नवले, सचिन गोडसे, दत्तात्रय आंधळे, सुवर्णा वाळुंज, सुरेश ढवण, अमोल बोडखे, शिवाजी वाफारे, दौलत शिंदे, कृष्णा ढोमे यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, नवी मुंबईतील नगरसेवक रवींद्र इथापे, पनवेल महापालिकेचे नगरसेवक रामदास शेवाळे यांनीही महानगर बँकेच्या कामोठे शाखेला शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन समारंभात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहकार क्षेत्रातील जीएस महानगर बँकेचे योगदान अधोरेखित केले. ही बँक सर्वसामान्यांची आहे. ठेवीदारांचे पैसे पुन्हा त्यांच्याच विकासासाठी वापरले जातात. या बँकेच्या माध्यमातून अनेक उद्योजक घडले असून स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळाला आहे, असे ते म्हणाले. पनवेल परिसरात बँकेच्या अनेक शाखा कार्यरत असून सभासद आणि ठेवेदारांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. (पान २ वर..)

# देशाची बदनामी करण्यात काँग्रेस मग्न -पीएम मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीत झालेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिटमध्ये युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शर्ट काढून केलेल्या आंदोलनाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २२) सडेतोड शब्दांमध्ये समाचार घेतला. काँग्रेस घाणेरड्या आणि नग्न राजकारणासाठी एका जागतिक कार्यक्रमाचा वापर करत असल्याचा आरोपही पंतप्रधान मोदी यांनी केला.



मेरठ येथील एका जनसभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर बोचरी टीका केली. ते म्हणाले, तुम्ही आधीच वैचारिकदृष्ट्या नागवे आहात, मग तुम्हाला कपडे उतरवण्याची गरजच काय पडली? काँग्रेसच्या नेत्यांनी जे केले ते या देशातील सर्वात जुना पक्ष किती वैचारिकदृष्ट्या दरिद्री झाला आहे हे दर्शवते. काँग्रेस स्वतःच्याच देशाची बदनामी करण्यात मग्न आहे. देशातील काही राजकीय पक्षांना भारताचे यश पचनी पडत नाहीये.

भारतात नुकतीच जगातील सर्वात मोठी एआय परिषद पार पडली, पण काँग्रेस आणि त्यांच्या इकोसिस्टमने काय केले? तर एका जागतिक कार्यक्रमाला त्यांनी आपल्या घाणेरड्या राजकारणाचा अड्डा बनवले, अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली.

एआय समिट हा भाजपचा कार्यक्रम नसल्याचे स्पष्ट करत पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेस नेते माझा द्वेष करतात, ते माझी कबर खोदू इच्छितात. अगदी माझ्या आईचा अपमान करायलाही ते मागे-पुढे पाहत नाहीत, मात्र त्यांनी हे लक्षात घ्यायला हवे होते की, ही परिषद राष्ट्रीय कार्याचा भाग होती, भाजपचा कार्यक्रम नव्हता. काँग्रेसने त्या दिवशी सर्व मर्यादा ओलांडल्या असून त्यांच्या या भ्रष्ट धोरणाचा संपूर्ण देश निषेध करत आहे.

# नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता देवजीची शरणागती

**गडचिरोली :** देशातील नक्षलवादी चळवळीचा कणा समजला जाणारा सर्वोच्च जहाल नक्षलवादी नेता तथा नक्षल संघटनेचा महासचिव थिप्परी तिरुपती ऊर्फ देवजी याने आपला खंदा समर्थक आणि सीसीएम सदस्य संग्राम याच्यासह तेलंगणा पोलिसांसमोर गुडघे टेकल्याची माहिती आहे. नक्षल चळवळीच्या इतिहासातील हा आतापर्यंतचे हे सर्वोच्च आत्मसमर्पण मानले जात आहे.



देवजी हा नक्षलवादी संघटनेच्या पॉलिट ब्युरोचा सदस्य असून तो चळवळीचा मुख्य रणनीतीकार मानला जातो. नक्षलवाद्यांचे आंतरराष्ट्रीय संपर्क, शस्त्रास्त्रांची रसद आणि मोठ्या हल्ल्यांचे नियोजन त्याच्याच इशाऱ्यावर होत असे.

## निवडक

### अमरावतीमध्ये भीषण अपघात; पाच जणांचा मृत्यू, १५ जखमी

**अमरावती :** मध्य प्रदेशातील देडतलाई येथील आठवडी बाजार आटोपून परतणाऱ्या व्यापाऱ्यांच्या आणि ग्रामस्थांच्या पीकअप गाडीला धारणी तालुक्यातील शिवाझिरी घाटात रविवारी (दि. २२) सायंकाळी भीषण अपघात झाला. घाटात चढण चढताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप मागे सरकून उलटली. या दुर्दैवी घटनेत पाच जणांचा जागीच मृत्यू झाला असून १५हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत.

### चेन्नईच्या समुद्रात महाराष्ट्रातील तिघे बुडाले; तरुणीचा मृत्यू

**चेन्नई** : येथील एका आयटी कंपनीत इंटर्नशीप करणाऱ्या २६ जणांच्या ग्रुपमधील महाराष्ट्रातील तिघे गोल्डन बीचवर पाण्यात वाहून गेले. त्यातील भंडारा येथील मयुरी चौधरीचा मृतदेह सापडला असून जळगावचा जय पाटील बेपत्ता आहे, तर राज केदारी याला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले आहे. या घटनेची माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तामिळनाडू सरकारशी संपर्क साधला आहे.

# पाकिस्तान-बांगलादेशशी संबंधित आठ संशयित दहशतवाद्यांना अटक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली पोलिसांनी पाकिस्तानच्या दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबा (एलईटी), पाकिस्तानची गुप्तचर संस्था इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (आयएसआय) आणि बांगलादेशस्थित अतिरेकी संघटनांशी संबंध असलेल्या मोठ्या दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधून आठ संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे.

तामिळनाडूच्या तिरुप्पूर जिल्ह्यातील गारमेंट युनिट्समधून मिजानुर रहमान, मोहम्मद शबत, उमर, मोहम्मद लिटन, मोहम्मद शाहिद आणि मोहम्मद उज्जल अशी सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले, तर इतर दोघांना पश्चिम बंगालमधून अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

पोलीस सूत्रांनुसार हे मॉड्यूल लष्कर-ए-तोयबाशी जोडलेले आहे आणि त्याचा हँडलर हा काश्मीरचा रहिवासी आहे, जो सध्या बांगलादेशातून कार्यरत आहे. हँडलरला पाकिस्तानमध्ये दहशतवादी प्रशिक्षण मिळाले असल्याचे मानले जाते आणि अटक केलेले आठ संशयित त्याच्या इशाऱ्यावर काम करत होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दिल्लीसह अनेक शहरांची हेरगिरी करणारे डझनभर मोबाईल फोन आणि सिम कार्ड जप्त केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. अटक केलेल्यांपैकी काही बांगलादेशी नागरिक आहेत. हे आरोपी आपली ओळख लपवण्यासाठी बनावट आधार कार्डांचा वापर करत होते आणि गारमेंट उद्योगात कार्यरत होते.

दिल्लीतील गर्दी असलेल्या धार्मिक आणि वारसा स्थळांना लक्ष्य करण्याचा संभाव्य दहशतवादी कट रचल्याचा इशारा गुप्तचर यंत्रणांनी दिल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्रीय राजधानीत हाय अलर्ट जारी केला. त्यानंतर ही अटकेची कारवाई करण्यात आली.

# सीकेटी कॉलेजमध्ये निर्मिती फॅशन शो

### आदिवासी जमातींची समृद्ध परंपरा रॅम्पवर सादर | लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून उपक्रमास शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील फॅशन अ‍ॅण्ड अपॅरल डिझाईन विभागामार्फत शनिवारी (दि.२१) वार्षिक निर्मिती फॅशन शो उत्साहात झाला. यामध्ये सर्जनशीलता, संस्कृती आणि नाविन्य यांचा सुंदर संगम पहायला मिळाला. विशेषतः भारतातील विविध आदिवासी जमातींची समृद्ध परंपरा आकर्षक आणि रंगतदार पोशाखांद्वारे प्रभावीपणे सादर करण्यात आली.



या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले व फॅशन अ‍ॅण्ड अपॅरल डिझाईन विभागाचा उज्ज्वल भविष्यकाळ असल्याचे नमूद केले. त्यांच्यासमवेत संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व अन्य मान्यवर उपस्थित होते.

या फॅशन शोमध्ये देशातील विविध आदिवासी संकल्पनांवर आधारित थीम्स अत्यंत कल्पकतेने आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून सादर करण्यात आल्या. एसवायबीएस्सी आणि टीवायबीएस्सी फॅशन अ‍ॅण्ड अपॅरल डिझाईन विभागातील विद्यार्थ्यांनी विविध जमातींचा सखोल अभ्यास करून त्यांच्या पारंपरिक घटकांना आधुनिक आणि बाजारपेठेस अनुरूप डिझाईन्समध्ये रूपांतरित केले. त्यांच्या मेहनतीचे आणि संशोधनाचे प्रतिबिंब रॅम्पवर स्पष्टपणे दिसून आले.

या कार्यक्रमाच्या परीक्षक म्हणून मुंबईस्थित सेतू ग्राम संस्थेच्या संस्थापक निधी गोयल उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे आणि पोशाखांच्या संकल्पनांचे कौतुक करत डिझाईन्स अत्यंत विचारपूर्वक आणि प्रभावी पद्धतीने मांडल्याचे सांगितले तसेच भविष्यात आपल्या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची तयारी त्यांनी दर्शविली. (पान २ वर..)

# उलवेतील रामशेठ ठाकूर मैदानावर घुमला कबड्डीचा दम!

**उलवे नोड : हरेश साठे**

संघभावना, अचूक रणनीती, वेगवान चढाया आणि बचावातील नियंत्रण यांचा रोमांचक संगम उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर मैदानावर कबड्डी स्पर्धेतून अनुभवायला मिळाला. निमित्त होते गोरगरिबांचे आधारस्तंभ, दानशूर व्यक्तिमत्त्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय प्रौढ महिला व पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी २०२६ स्पर्धेचे.





श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २० ते २२ फेब्रुवारी अशा तीन दिवस खेळवण्यात आलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील ३२ महिला आणि १२८ पुरुष संघांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत खेळाडूंनी आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन घडवत प्रेक्षकांची मने जिंकली. अनेक सामन्यांमध्ये चुरशीची लढत पहायला मिळाली. स्पर्धेच्या माध्यमातून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करून त्यांना पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. जिल्हास्तरावर दर्जेदार खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने ही निवड चाचणी महत्त्वपूर्ण ठरली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी जनरल सेक्रेटरी अ‍ॅड. आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजकांनी केलेले उत्तम नियोजन, पंचांची काटेकोर कामगिरी आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मोठे यश लाभले.

कबड्डी हा ग्रामीण मातीतून उगम पावलेला खेळ असला तरी आज तो राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धांना विशेष महत्त्व असते. उलवे नोडमधील स्पर्धेच्या माध्यमातूनही गुणवंत खेळाडूंना पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संधी मिळणार आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडू आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरला. पुरुष व महिला या दोन्ही गटातील सामने रंगतदार झाले. चढाई करताना खेळाडूंची वेगवान हालचाल आणि बचावपटूंची एकजूट यामुळे प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट होत होता. अनेक सामन्यांमध्ये कडवी झुंज पहायला मिळाली. (पान २ वर..)

# हरिहरेश्वर बीचवर बैलगाडी शर्यतीचा थरार

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

हरिहरेश्वर मारळ येथील समुद्रकिनाऱ्यावर आयोजित भव्य बैलगाडी शर्यतीत पारंपरिक क्रीडा संस्कृतीचा जल्लोष अनुभवायला मिळाला. शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत, ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषमय वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत भेंडखोल गावचे स्वप्नील कोलथकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.



समुद्राच्या लाटांचा गजर आणि वाळूतून धावणाऱ्या बैलगाड्यांचा वेग असा रोमांचकारी संगम यावेळी पाहायला मिळाला. परिसरातील अनेक नामांकित स्पर्धकांनी सहभाग घेतल्याने स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली. अंतिम फेरीत स्वप्नील कोलथकर यांच्या बैलगाडीने वेग, ताकद आणि नियंत्रण यांचा सुरेख मिलाफ साधत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले.

शर्यतीदरम्यान प्रेक्षकांकडून सतत घोषणाबाजी व टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. विजयानंतर भेंडखोल गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.



# आता केवळ गाव तिथे नव्हे; तर आदिवासीपाडा तिथेही एसटी!

**मुंबई : प्रतिनिधी**



सह्याद्री व मेळघाटच्या कुशीत, धुक्याने वेढलेल्या डोंगरदऱ्यांमध्ये, आजवर केवळ पायवाटांनीच ओलांडलेले अंतर आता 'लालपरी' च्या चाकांनी मोजले जाणार आहे! राज्यातील दुर्गम आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची सेवा पोहोचवण्याचा ऐतिहासिक संकल्प परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला. आता केवळ गाव तिथे एसटी नाही, तर आदिवासी पाडा तिथे एसटी, असा ठाम निर्धार करत त्यांनी विकासाचा नवा अध्याय सुरू केल्याची घोषणा केली.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' मिडी बसेस – विकासाची नवी वाट राज्य परिवहन महामंडळ ९ मीटर लांबीच्या, ३५ आसनी अशा १०० अत्याधुनिक मिडी बसेस खरेदी करीत असून या बसेसना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' असे प्रेरणादायी नामकरण करण्यात येणार आहे. अरुंद रस्ते, तीव्र चढ-उतार आणि वळणावळणाच्या घाटरस्त्यांवरून सहज धावू शकतील, अशा या बसेस खास करून आदिवासी पाड्यांसाठीच नियोजित आहेत.

स्वातंत्र्यानंतरच्या आठ दशकांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एसटी पोहोचली. आज तब्बल ९३% लोकसंख्या एसटी सेवेशी जोडलेली आहे. तरीही सह्याद्री व मेळघाटच्या दऱ्याखोऱ्यातील अनेक पाडे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूरच राहिले होते. मोठ्या बसेसना तिथे प्रवेश शक्य नव्हता; त्यामुळे शिक्षण, आरोग्य आणि रोजगारासाठी आदिवासी बांधवांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. आता मात्र ही पायपीट थांबणार आहे. पायवाटांवरून चाकवाटांकडे ही केवळ बससेवा नाही, तर सामाजिक समावेशकतेचा सेतू आहे. शिक्षणासाठी शहरात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, आरोग्यसेवेसाठी धाव घेणाऱ्या मातांसाठी आणि रोजगाराच्या शोधातनिघालेल्या तरुणांसाठी ही 'पुण्यश्लोक अहिल्यादेवीबस म्हणजे आशेचा किरण ठरणार आहे.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, दुर्गम भागातील आपला आदिवासी समाज आता एसटीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राशी जोडला जाईल. विकासाची गंगा प्रत्येक पाड्यापर्यंत पोहोचवण्याचा हा आमचा निर्धार आहे. विकासाचा नवा संकल्प

'लालपरी'च्या चाकांमध्ये आता केवळ प्रवास नाही, तर परिवर्तनाची गती दडलेली आहे. डोंगर-दऱ्यांतील शांत पाड्यांवर लवकरच एसटीचा हॉर्न घुमेल आणि त्या आवाजात विकास, समता आणि संधींची नवी पहाट दडलेली असेल. असा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## खालापूर टोल नाक्याजवळ ट्रकचालकावर हल्ला; लूटमारीचा प्रयत्न

**खोपोली : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे महामार्गवरील खालापूर टोल नाक्याजवळ ट्रकचालकावर लूटमारीचा प्रयत्न झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. ट्रक क्रमांक MH-१०-CR-५४५६ चे चालक-मालक गणेश नागरगोजे यांचे वाहन तांत्रिक बिघाडामुळे रस्त्याच्या कडेला उभे असताना काही अज्ञात तरुणांनी त्यांच्यावर जोरजबरदस्ती करत मारहाण केली आणि पैशांची मागणी केल्याची माहिती आहे. यावेळी अज्ञात इसपांनी ट्रक चालकाचा मोबाईल फोडला आहे.

घटनास्थळी उपस्थित इतर वाहनचालकांनी सांगितले की, संबंधित तरुणांनी धमकावत पैसे उकळण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे महामार्गावरील चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान, घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असता तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचा कथित आरोप करण्यात येत आहे. तुम्हाला गुन्हा दाखल करायचा असेल तर करा, असे सांगत पोलिसांनी स्वतःहून कारवाई केली नसल्याची माहिती उपस्थित चालकांनी दिली. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ खालापूर सचिव साबीर शेख यांना चालकवर्गाने संपूर्ण घटनाक्रम कथन केला.

महामार्गावर वाढत्या लूटमारीच्या घटनांमुळे टोल प्रशासन, आयआरबी व्यवस्थापन आणि पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. २४ तास सुरक्षा यंत्रणा आणि सीसीटीव्ही देखरेख असतानाही अशा घटना घडत असल्याने रस्ते सुरक्षेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच महामार्गावरील वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी चालकवर्गातून होत आहे.

## लग्नाचे आमिष दाखून विद्यार्थिनीवर अत्याचार; पीडिता गर्भवती, आरोपीला अटक

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोहितबाग लॉजवर महाड तालुक्यातील करंजखोल गावातील एका विद्यार्थिनीला आणून तिच्या इच्छेविरूध्द संबंध ठेवल्याप्रकरणी पोलादपूर पोलीसांनी आरोपीला नाशिक येथून अटक करून महाड न्यायालयासमोर हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

महाड तालुक्यातील करंजखोल येथील एका तरूण विद्यार्थिनीला दि.२१ डिसेंबर २०२४ पासून दि.१४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान लग्नाचे अमिष दाखवून तिच्या इच्छेविरुध्द पोलादपुर येथील मोहीतबाग लॉज तसेच महाड येथील हॉटेल आंगण लॉज व ठाणे तसेच नाशिक येथील लॉजवर वेळोवेळी नेवून जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवले.

यातुन पिडीत तरूणी गरोदर राहिली असताना देखील तिच्याशी जबरदस्तीने शारिरीक संबंध केले.

याप्रकरणी पिडीत तरूणीने स्वत: तरूणाविरूध्द दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास पोलादपूर पोलीस ठाण्यात येऊन हे.कॉ. सुतार यांच्याकडे फिर्याद दाखल केल्यानंतर आरोपी प्रसाद जिभाऊ नाडेकर, वय २३ वर्षे, राहणार राहू हॉटेलसमोर, संत सावरकर नगर, पेठ रोड, नाशिक याला पोलादपूर पोलीसांनी तातडीने नाशिक येथे जाऊन अटक केली आणि त्याच्याविरूध्द गुन्हा र.जि. नंबर ०६-२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मंगेश आर. मुंढे यांनी नाशिक येथून आरोपीस ताब्यात घेतले आणि महाड न्यायालयासमोर हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियान अंतर्गत विविध ठिकाणी लोकसहभागातून स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविताना स्वच्छता ही एकत्रितपणे करण्याची गोष्ट असल्याचे लक्षात घेत लोकसभागावर भर देण्यात येत आहे. या अनुषंगाने आज रविवारच्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी संत निरंकारी मिशन या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून अमृत प्रकल्प अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' हे स्वच्छता अभियान नवी मुंबईत ठिकठिकाणी व्यापक स्वरूपात राबविण्यात आले. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मी यांच्याप्रमाणेच संत निरंकारी मिशनचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ज्वेल ऑफ नवी मुंबई हे पर्यटकांचे नवी मुंबईतील आकर्षण केंद्र आहे. या ठिकाणी असलेल्या जलाशयाच्या परिसरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ अजय गडदे, उपमुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर तसेच स्वच्छता निरीक्षक, उपस्वच्छता निरीक्षक व स्वच्छताकर्मी यांच्यासह २५० हून अधिक संत निरंकारी मिशनचे स्वयंसेवक उत्साहाने सहभागी झाले होते. या सर्वांनी एकत्रित येऊन ज्वेल ऑफ नवी मुंबई जलाशयाच्या परिसराची सखोल स्वच्छता केली.

अशाच प्रकारचे स्वच्छता अभियान संत निरंकारी मिशनच्या नेरूळ विभागातील पदाधिकारी व सदस्य यांच्या सहयोगाने शिरवणे जुईनगर येथील चिंचोली तलाव परिसरात राबवण्यात आले.

## माणगावचा पाणीपुरवठा दोन दिवस राहणार बंद

**माणगांव : बातमीदार**

माणगांव नगरपंचायत उतेखोलगावातील जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा करणाऱ्या २.५ दशलक्ष जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे कामी मंगळवार व बुधवार दि.२४ व २५ फेब्रुवारी २०२६ या दोन दिवसांकरिता माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये पिण्याचा पाणी पुरवठा पूर्णतहा बंद ठेवण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी या दोन दिवसासाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन करुन पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवावा व पाण्याचा जपून वापर करावा तसेच पिण्याचे पाणी सध्या गाळून उकळून स्वच्छ करून घ्यावे अशी महत्त्वपूर्ण सूचना नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडून माणगांवकरांना देण्यात येत आहे.

या कामाचे संदर्भात माणगाव नगरपंचायत पाणीपुरवठा सभापती कपिल गायकवाड यांनी जलशुद्धीकरण केंद्रात संबंधित कामाचे कंत्राटदार तसेच पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी यांचे सोबत गुरुवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आढावा बैठक घेत हे काम दोन दिवसात पाणीपुरवठा बंद ठेवून होणार असल्याने नागरिकांस कमीतकमी त्रास होईल व योग्यरीतीने व वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन व सूचना त्यांना केल्या, तसेच नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

माणगांव शहरासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मंजुरीने राबविण्यात येणाऱ्या अमृत पाणी पुरवठा योजने' अंतर्गत सुरू असलेली नवीन पाइपलाइन व जलशुद्धीकरण यंत्रणेची कामे सध्या वेगाने सुरू आहेत. शहरातील वाढती लोकसंख्या आणि विस्तारणाऱ्या वसाहती लक्षात घेता भविष्यातील २४ तास शुद्ध पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. योजनेत विद्यमान कार्यरत दोन्ही फिल्टर प्लांटचे अद्ययावत नुतनीकरण, नवीन टाक्या, एमबीआर जलकुंभ उभारणी तसेच संपूर्ण शहरात बिडा (कास्ट आयर्न) ऐवजी एसडीपी पाइपलाइन बसविण्याचे काम करण्यात येत आहे.

ही योजना कोणत्याही राजकीय प्रेरणेतून नव्हे तर शहराच्या दूरगामी हितासाठी निर्हेतुकपणे पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा माणगांवकरांनी व्यक्त केली आहे. पुढील वर्षभरात माणगांव नगरपंचायत निवडणुका होणार असल्याने हा मुद्दा संवेदनशील बनला आहे. त्यामुळेच नगराध्यक्ष, पाणीपुरवठा सभापती, सर्वच नगरसेवक, मुख्याधिकारी, कनिष्ठ अभियंता तसेच ठेकेदार यांनी या योजनेबाबत सतर्क राहून नियोजनबद्ध कार्यवाही करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

जुन्या पाणीपुरवठा योजनेमुळेच शहराचा विकास जलदगतीने होऊ शकला आणि वाढत्या वसाहतींमध्येही पाण्याची उपलब्धता राहिली आहे. हे नागरिकांच्या स्मरणात आहे. भविष्यातील २४ तास शुद्ध पाणीपुरवठा, वाढत्या पाणीपट्टीचे भान आणि शहरातील अंतर्गत रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी पाहता या कामात शहरातील रस्ते सुस्थितीत राखणे हे देखील महत्त्वपूर्ण आहे.

सध्या विद्यमान पाणीपुरवठा योजना जुन्या जनगणनेनुसार काही तांत्रिक अडचणी वगळता सुरळीत कार्यरत आहे. त्यामुळेच नवीन योजनेच्या कामात कोणतीही अनाठायी घाई नको, अशी भावना नागरिकानी व्यक्त केली.

## शिमगोत्सवाची धूम; साखरी-मंडणगडची पालखी हरिहरेश्वरमध्ये उत्साहात दाखल

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**



फाल्गुन महिन्याच्या आगमनासोबतच कोकण पट्ट्यात शिमगोत्सवाची लगबग सुरू झाली असून गावागावांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. होळीच्या सुमारे १५ ते २० दिवस आधीपासूनच सणाची चाहूल लागते. महिलांकडून ग्रामदेवतेसाठी पारंपरिक ओव्या, भारुडे आणि भक्तिगीते गात प्रार्थना केली जाते. या गायनातून गावाच्या सुख-समृद्धीसाठी साकडे घातले जाते.

फाल्गुन पंचमीपासून शिमगो उत्सवाला औपचारिक सुरुवात होते. पंचमीच्या दिवशी पहिली होळी प्रज्वलित केली जाते. त्यानंतर गावातील खेळे खास पारंपरिक वेशभूषेत सजून घराघरांत जाऊन सादरीकरण करतात. डोक्यावर फेटे, गळ्यात फुलांच्या माळा, हातात पारंपरिक वाद्ये आणि चेहऱ्यावर रंगीबेरंगी रंग अशी त्यांची वेशभूषा आकर्षण ठरते. विशेष म्हणजे हे खेळ अनवाणी सादर करण्याची परंपरा आजही काटेकोरपणे पाळली जाते.

होळीपूर्वी चार ते पाच दिवस खेळांची गावात वर्दळ असते. प्रत्येक घरासमोर ढोल, ताशा, मृदुंग आणि झांजांच्या तालावर पारंपरिक नृत्ये सादर केली जातात. शेजारील गावांमध्येही खेळांची देवाणघेवाण होत असल्याने परिसरात सांस्कृतिक ऐक्याची भावना दृढ होत आहे.

होळीच्या दिवशी विधिवत पूजन करून नवस फेडले जातात. दुसऱ्या दिवशी ग्रामदेवतेची पालखी मोठ्या भक्तिभावाने काढण्यात येते. देवाची पालखी गावागावांत फिरवली जाते. गावकरी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत ग्रामदेवतेच्या जयघोषात पालखीचे स्वागत करतात. प्रत्येक वाडी-वस्तीत पालखी नेऊन आरती, पूजा व नैवेद्य अर्पण केला जातो. घराघरांतून फुलांची उधळण करत देवाचे आशीर्वाद घेतले जातात.

दरम्यान, शिमगोत्सवानिमित्त रत्नागिरी जिल्ह्यातील -मंडणगड तालुक्यातील साखरी गावातून निघालेली ग्रामदैवताची पालखी मोठ्या भक्तिभावात श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथे दाखल झाली. ढोल-ताशांच्या गजरात, गुलालाच्या उधळणीत आणि जयघोषात पालखीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

साखरी परिसरातून पारंपरिक विधीवत पूजन करून पालखी प्रस्थान झाली होती. मार्गातील विविध वाड्या-वस्त्यांमध्ये पालखीचे औक्षण करण्यात आले.ग्रामस्थांनी फुलांचीउधळण करत दारोदारी आरती ओवाळनीकरत स्वागत केले व अनेक भाविकांनी नवस फेडत दर्शन घेतले.

## महाड पोलीस निरीक्षक रमेश तडवी यांचा आत्महत्येचा इशारा

**महाड : प्रतिनिधी**



महाड पोलीस निरीक्षक विजय रमेश बामन्या तडवी यांनी राज्याचे पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांना लिहिलेल्या लेखी पत्रात आपल्या विरोधात आपण खालच्या जातीचे असल्याचे सांगत अन्यायकारक कार्यवाही होऊन आपली पुन्हा बदली केल्याचे नमूद करून याप्रकरणी न्याय न मिळाल्यास आपण आत्महत्या करणार असल्याचा लेखी इशारा पत्राद्वारे दिल्याने संपूर्ण रायगड मधील पोलीस खात्यासह राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

या लेखी पत्रात त्यांनी आपल्यावरील झालेल्या अन्यायाचा पाढा वाचला असून यापूर्वी देखील आपल्यावर झालेल्या अन्याय विरोधात आपण मॅट मध्ये जाऊन न्याय प्राप्त केला होता ,ज्यामुळे बदली आदेश रद्द होऊन आपली महाड शहर पोलीस निरीक्षक म्हणूनच १२ सप्टेंबर २५ रोजी पुन्हा नियुक्ती झाली होती याची आठवण करून दिली.

आपण भिल्ल आदिवासी म्हणजेच खालच्या जातीचे असल्यानेच आपली जाणीवपूर्वक बदली अलिबाग नियंत्रण कक्षात करण्यात आल्याचे नमूद करून ही सर्वथा अयोग्य असून याकरिता त्यांनी तत्कालीन पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे रायगड ,विद्यमान पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीवर्धन सविता गर्जे ,पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हा शाखा अलिबाग मिलिंद खोपडे, व महाड एमआयडीसीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने हे जबाबदार असून आपण आत्महत्या केल्यानंतर या सर्वांच्या विरोधात अट्रॉसिटी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली आहे

डिसेंबर महिन्यामध्ये महाडमध्ये झालेल्या एका गुन्ह्याचा अहवाला देऊन याप्रकरणी अधिकाऱ्यांनी माझ्याकडे तीन संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करावा म्हणून दबाव आणला होता मात्र मी हा दबाव झुगारून अशा पद्धतीने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आणले.

पान १ वरुन

## केंद्रीय सहकारमंत्री अमित शाहांच्या नेतृत्वाखाली बँकिंग क्षेत्राला नवी ऊर्जा -आमदार प्रशांत ठाकूर

आर्थिक उलाढाल वाढत असल्यामुळे बँकेवरील लोकांचा विश्वास दृढ होत आहे. आगामी काळात शंभरहून अधिक शाखा सुरू करण्याचा संकल्प पूर्णत्वास जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला तसेच स्थानिक आमदार म्हणून बँकेच्या प्रगतीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांनी संचालक मंडळाने केलेल्या आधुनिकीकरणाच्या उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. कामोठे शाखेत आगामी काळात १०० कोटींहून अधिक आर्थिक उलाढाल होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला, तर सहकार चळवळीच्या बळावर उभी असलेली ही संस्था आगामी काळात आर्थिक क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित करेल, असा आशावाद उपस्थितांनी व्यक्त केला.

## सीकेटी कॉलेजमध्ये निर्मिती फॅशन शो

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विज्ञान शाखेचे प्रभारी डॉ.जे.एस. ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभाग प्रमुख आकाश पाटील यांनी केले, तर कोरिओग्राफी मिस स्नेहा जाजू यांनी केली होती. डॉ.बी.डी. आघाव, डॉ. एस.आय. उन्हाळे, डॉ.आर.व्ही. येवले, गणेश जगताप, एस. कांबळे उपस्थित होते.

विविध गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे सर्व मॉडेल्स महाविद्यालयातीलच विद्यार्थी होते. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी फॅशन अँण्ड अपॅरल डिझाईन विभागाच्या समन्वयक दीपश्री राठोड, प्रा. नीलिमा वाघ, नीलम किरदत आणि प्राजक्ता वराडकर यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

## उलवेतील रामशेठ ठाकूर मैदानावर घुमला कबड्डीचा दम!

स्पर्धेच्या आयोजनात खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामध्ये दर्जेदार क्रीडांगण, वैद्यकीय सुविधा, प्रेक्षक गॅलरी, भोजन, नाश्ता अशा सर्व आवश्यक व्यवस्थांचा समावेश होता. विशेष म्हणजे खेळाडू व त्यांचे सहकारी तसेच पंच, प्रेक्षक यांना रणरणत्या उन्हाची झळ लागू नये म्हणून क्रीडांगणावर छत टाकण्यात आले. उलवे परिसरात या निमित्ताने क्रीडामय वातावरण निर्माण झाले. कबड्डीप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन देत त्यांचा उत्साह वाढवत होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक संस्थांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**दुखवटा**

## धाया भोईर



**पाली** : पेण पंचायत समितीचे माजी सभापती तथा विद्यमान पंचायत समिती सदस्य, संजय भोईर यांचे वडील धाया भोईर यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा,सून, २ मुली, जावई, नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे.

# रस्ता सुरक्षा ही सामाजिक बांधिलकी -आमदार प्रशांत ठाकूर

## ◆ खारघरमध्ये हेल्मेटचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रस्ता सुरक्षा व जनजागृती कार्यक्रम २०२६ आणि भारतीय जनता पक्ष वाहतूक सेल खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मोफत हेल्मेट वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नागरिकांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपली व आपल्या सोबत प्रवास करणाऱ्यांची सुरक्षा हीच आपली जबाबदारी हा महत्त्वाचा मूलमंत्र दिला. रस्ता सुरक्षा ही केवळ वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी नसून ती एक महत्त्वाची सामाजिक बांधिलकी आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. प्रत्येक वाहनचालकाने दुचाकी चालवताना हेल्मेटचा नियमित वापर करून स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे रक्षण करावे, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले.

या उपक्रमाच्या माध्यमातून रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि सुरक्षित प्रवासाची सवय लावण्यासाठी भाजप वाहतूक सेलने पुढाकार घेतल्याबद्दल आमदार ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले.

यावेळी पनवेल महापालिकेच्या नगरसेविका परेशा पटेल, ब्रिजेश पटेल, दीपक शिंदे, साधना पवार, अमर उपाध्याय, प्रवीण बेरा यांसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# कर्नाळा परिसरात आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा विभागातील आखाडा वाडी येथे रविवारी (दि.२२) इंडियन मेडिकल असोशियन मुंबई आणि पहल सामाजिक संस्था चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत औषधे असा आरोग्य कॅम्प आयोजित करण्यात आला होता. यात ८६ रुग्णांची तपासणी करण्यात आली.



या कॅम्पमध्ये चार आदिवासी वाडीत शिकत असलेल्या फक्त आदिवासी विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक टॉवेल देण्यात आला. तपासणीनंतर पेशंटना प्रोटीन टॉनिकचा डबा देण्यात आला तसेच चारही (लहूची वाडी, विठ्ठल वाडी, ब्राम्हनडुंगी, आखाडा वाडी) या वाड्या आणि गावातील पेशंटनादेखील तपासून मोफत औषधे देण्यात आली.

कॅम्पसाठी ग्रामस्थ व तरुण युवक मंडळ आखाडा वाडी आणि सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी मेहनत घेतली.

# मन की बात कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रविवारी मन की बात या कार्यक्रमाच्या १३१व्या भागाद्वारे देशवासीयांशी संवाद साधला. या विशेष भागात त्यांनी प्रामुख्याने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि देशातील तांत्रिक विकासाच्या प्रगतीवर भाष्य करत नागरिकांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सामूहिक प्रक्षेपण पनवेल शहर अध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आले होते. या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून नागरिकांसोबत पंतप्रधानांचे विचार

### *विविध विषयांवर भाष्य*

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'द्वारे देशाला संबोधित केले. त्यांनी 'एआय इम्पॅक्ट समिट, 'डिजिटल अरेस्ट', तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जयललिता यांचे महिलांसाठी योगदान, केरळच्या आलीन इब्राहिम चिमुकलीचे अवयवदान, नियमित केवायसी, शेती, क्रिकेट अशा विविध विषयांवर भाष्य केलं आहे.**

ऐकले. पंतप्रधानांनी आपल्या संवादातून देशाच्या विकासाचे विविध पैलू, प्रेरणादायी उपक्रम आणि राष्ट्रनिर्मितीमध्ये सामान्य नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञानाचा वापर करून समाजहित कसे साधता येईल, यावर त्यांनी दिलेले मार्गदर्शन कार्यकर्त्यांसाठी आणि उपस्थितांसाठी नवी ऊर्जा देणारे ठरले.

या कार्यक्रमामुळे समाजसेवेची नवी प्रेरणा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या वेळी उल्हास झुंझारराव, प्रशांत झुंझाराव, जितेंद्र झुंझारराव, प्रविण मोरबाळे, नंदकिशोर धोत्रे, महेंद्र शेट्ये, केदार जोशी, सुशांत कदम, आदित्य देशमुख आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये आरोग्य शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील बिरमोळे मेडिकल फाउंडेशन व सिटीझन्स युनिटी फोरम या सेवाभावी सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कफनगर पनवेल येथील बिरमोळे हॉस्पिटलमध्ये सुमारे सव्वाशे रुग्णाची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये क्ष किरण तपासणी, हृदयस्पंदन आलेख, रक्ताच्या विविध चाचण्या, दंतचिकित्सा,नाक कान व घसा तपासणी, अस्थि घनता चाचणी, दमा आजाराविषयी तपासणी, इत्यादी विविध प्रकारच्या चाचण्या करण्यात आल्या. बिरमोळे हॉस्पिटलमधील तज्ञ डॉक्टर व समीर सहस्त्रबुद्धे, ऋषभ नेमा, किरण नाईक, आकाश भारती, शैलेश शर्मा या नामवंत डॉक्टरांनी सहभाग नोंदवला.

कफचे पदाधिकारी मयूर भोसले, विलास दातार व कार्यकर्ते पंकज रुपारेल, भारती खानोलकर, राजश्री देसाई, संदेश बुटाला, साधना पाटील तसेच बिरमोळे हॉस्पिटलमधील कांचन पुजारी, प्राजक्ता वातारे, सुचिता मयेकर व इतर कर्मचारी वर्ग यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.



# करंजा येथील जितेंद्र नाखवाची गगनभरारी

**उरण : बातमीदार**

उरण-करंजा या समुद्रकिनाऱ्याच्या मातीत वाढलेला एक साधा कोळी नाखवा मुलगा...स्वप्न मात्र मोठं! लाटांशी झुंज देणाऱ्या कुटुंबातून आलेल्या या मुलाने आयुष्यातही तितक्याच धैर्याने संघर्ष केला. आज तोच मुलगा आंतरराष्ट्रीय आतिथ्य क्षेत्रात यश संपादन करत जनरल मॅनेजर पदावर विराजमान आहे. त्यांचे नाव आहे जितेंद्र नाखवा.

लहानपणापासूनच जितेंद्र नाखवा यांना कष्ट, शिस्त आणि जिद्द यांचे संस्कार त्यांचे आई-वडील रोहिदास नाखवा आणि लीला नाखवा यांच्याकडून मिळाले. त्यांच्या मेहनतीने आणि प्रामाणिकपणानेच त्याच्या स्वप्नांना दिशा दिली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने हॉटेल इंडस्ट्रीत शेफ म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. स्वयंपाकघरातील घाम,



मेहनत आणि शिकण्याची ओढ यामुळे त्याने आपल्या कौशल्याची छाप उमटवली.

आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन मिळवण्यासाठी जितेंद्र नाखवा यांनी स्वित्झर्लंडमधील प्रतिष्ठित हॉस्पिटॅलिटी शिक्षण घेतले आणि जागतिक दर्जाचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याने भारतात आणि परदेशात जगातील नामांकित हॉटेल ब्रँड्ससोबत काम केले - जसे की Hyatt, IHG, Radisson आणि Hilton. या आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे त्याच्या नेतृत्व कौशल्यात आणि व्यवस्थापन क्षमतेत मोठी भर पडली.

भारताच्या विविध राज्यांत काम करताना त्याने स्थानिक खाद्यसंस्कृती आणि पाहुणचाराचे बारकावे आत्मसात केले. शेफ ते फूड अँड बेव्हरेज नेतृत्व असा प्रवास करताना त्याने टीम बिल्डिंग, ऑपरेशन्स आणि अतिथी समाधानात नवे मानदंड निर्माण केले. विविध संस्कृतींमध्ये काम करत त्याने जागतिक दर्जाचे व्यवस्थापन कौशल्य विकसित केले आणि संघटनेला नवी दिशा दिली.

२० फेब्रुवारी २०२६ रोजी CMO Asia यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात Taj Lands End येथे जितेंद्र रोहिदास नाखवा यांना Asia's Most Admired General Manager २०२६ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा ८२ व्यक्तींनी लाभ घेतला.

अदानी फाउंडेशनच्या वतीने आणि हर्षदा मांडवकर व विशाखा कांबळे (सामाजिक कार्यकर्ते) यांच्या मदतीने नेरे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा ८२ नागरिकांनी लाभ घेतला. यात ६९ महिला आणि सात पुरुष, सहा मुलांचा समावेश होता.

यावेळी ४४ व्यक्तींची मधुमेह चाचणी करण्यात आली. या शिबिराला नेरे ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश घाडगे यांनी भेट दिली.




# शांतिवन येथे एकदिवसीय कब-बुलबुल शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.२०) विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्य रुजवण्यासाठी कब-बुलबुल शिबिर आयोजित करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. शिबिराची सुरूवात कब - बुलबुलच्या प्रार्थनेने झाली. शिबिरात विविध गाणी, गोष्टी, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, गप्पागोष्टी आदींचे सादरीकरण करण्यात आले.



खरोखरच हे एक दिवसीय शिबीर हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील स्मरणीय ठेवा ठरेल आणि ह्या वयात विद्यार्थ्यांना मिळालेली शिस्त आणि स्वयंप्रेरकतेचे धडे हे आयुष्यभर लक्षात राहतात म्हणूनच अश्या शिबीरांचे आयोजन करण्यात आले असे आपल्या भाषणातून मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी व्यक्त केले. यावेळी शिबिरामध्ये सर्वज्ञ संतोष आहेर ह्या विद्यार्थ्याला बेस्ट कब तसेच शरयू संजय चव्हाण ह्या विद्यार्थिनीला बेस्ट बुलबुल म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

त्याचबरोबर लक्ष वर्षा जाधव, चिन्मयी प्रितेश परब तसेच स्पंदना संदीप जाधव ह्या विद्यार्थ्यांना सर्वोत्तम खरी कमाई केल्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी सन्मानचिन्ह देऊन कौतुक केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे नीलकंठ कोळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील भवितव्यासाठी शुभाशीर्वाद दिले.

सर्व पालकांनी शाळेने राबविलेल्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सहभागाची संधी दिली त्यामुळे शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, तसेच कब बुलबुल प्रशिक्षक सुरेंद्र ठमके, वर्ग शिक्षिका बीना नायर, प्रिया नायर तसेच लथा बालसुब्रमानियन व इतर सर्व शिक्षकांचे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे कौतुक करत आभार व्यक्त केले.

# उरण तालुक्यात पोपटी पार्टीचा हंगाम

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यात मागील आठवड्यापासून शेतात तसेच फार्म हाऊसमध्ये पोपट्या पार्ट्या रंगण्यास सुरुवात झाली आहे. चिरनेर परिसरात आता गावठी वाल व चवळीच्या शेंगा तयार होण्याची सुरुवात झाल्यामुळे पोपटीची लज्जत वाढली आहे. वालाच्या शेंगा तयार झाल्या की, खवय्यांना चाहूल लागते. ती पोपटी पार्टीची. त्यामुळे सवंगड्यांशिवाय कौटुंबिक नात्यांसह मित्र-मैत्रिणींबरोबर पोपटी पार्टीचे बेत आखले जाऊ लागले आहेत.



उरण तालुक्यात सध्या वाल चवळीच्या शेंगाचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे काही दिवसांपासून गावठी वालाच्या व चवळीच्या शेंगा बाजारात येऊ लागल्याने ग्राहक वाल व चवळीच्या शेंगा घेण्यास आतुर झाले आहेत.

वाल व चवळीच्या पिकासाठी थंडीचा हंगाम खूप उपयुक्त आहे. हे पीक दवावर तयार होते. जेवढी जास्त थंडी तेवढे पीक मोठ्या प्रमाणावर भरघोस येते. हे पिके तयार होण्यासाठी चार महिन्याचा कालावधी लागतो. या पिकासाठी जास्त मेहनत घ्यावी लागत नाही. परंतु या पिकाचा सुगंध वन्य प्राण्यांना आकर्षित करतो. वालाची झुडपे ही जंगली वानरे आणि रानटी उनाड गुरे यांचे आवडते खाद्य असल्यामुळे या प्राण्यांमुळे उरण तालुक्यातील रब्बी पिके धोक्यात आली आहेत. सध्या चिरनेरच्या बाजारात चवळी व वालाच्या शेंगांचा एक किलोचा दर १५० रुपये आहे. तरीही वाल चवळीच्या शेंगांना प्रचंड मागणी आहे. पोपटी तयार करण्यासाठी येथील मोकळ्या जागी पोपटीचे मडके किंवा पत्र्याचा डबा बसविण्यासाठी थोडासा खड्डा खणला जातो.

त्या खड्ड्यात मडके उपडे ठेवले जाते त्यानंतर मडक्याभोवती पाला, पेंढा, सुक्या काटक्या टाकून, त्याला आग लावली जाते. साधारण अर्धा ते पाऊण तास हे मिश्रण शिजवले जाते. अर्धा ते पाऊण तासाने पोपटी करणारे जाणकार मडक्यावर थोडे पाणी शिंपडतात. चर्र असा आवाज आला की पोपटी शिजल्याचे समजते. पोपटीचा गरमागरम वाफाळता आस्वाद घेण्यासाठी सारे बैठक मारून सभोवार बसतात.

मधोमध एका पेपरवर हे मडके ठेवून त्यातील वरचा भांबुर्डीचा पाला काढला जातो. मडक्यातील खमंग भाज्या मुळ्या तर मांसाहारी असल्यास मटन चिकन अंडी बाहेर काढण्यासाठी सगळेजण तुटून पडतात. निसर्गाच्या सानिध्यात शेतावर ही पोपटी पार्टी केली जाते. त्यामुळे पोपटी पार्टीचा अनुभव अवर्णीय असतो. हे चित्र आता ग्रामीण भागात दिसू लागले आहे.

**चिरनेरच्या बाजारात वाल चवळीच्या शेंगा खरेदी करण्यासाठी ग्राहकांची रेलचेल सुरु झाली आहे. ग्राहक आनंदाने या शेंगांची खरेदी करून, पोपटी पार्टीतून गावठी वालाच्या शेंगाची विशिष्ट प्रकारची चव चाखत आहेत.**
**-सांगिता परदेशी,**
**वाल शेंगा विक्रेती, चिरनेर**

# शॉपिंग सेंटर मॉलचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

वीरेंद्र जगे यांच्या द्वारकाधीश शॉपिंग सेंटर मॉलचे अभिनेत्री अक्षया देवधर यांच्या हस्ते २२ फेब्रुवारी रोजी मोठ्या थाटामाटात उद्घाटन करण्यात आले. पळस्पे फाटा (पनवेल) येथे असलेल्या द्वारकाधीश शॉपिंग सेंटर मॉलमध्ये ग्राहकांना साड्यांसह, ज्वेलरी, बॅग, पर्स, लहान मुलामुलींचे कपडे, किड्स वेअर, महिलांचे कपडे, मेन्स वेअर आणि इतर वस्तूंची खरेदी स्वस्तात करता येणार आहे. या शॉपिंग मॉलचा पत्ता पळस्पे फाटा, डी मार्टच्या बाजूला असा आहे

यावेळी तुझ्यात जीव रंगला फेम अभिनेत्री अक्षया देवधर यांनी मराठी माणूस व्यवसाय करत असल्याचे पाहून आनंद वाटला असे सांगितले तसेच या शॉपिंग सेंटरमध्ये बऱ्याचशा वस्तू ग्राहकांना एकाच ठिकाणी मिळणार आहेत. या ठिकाणी २०० जण नोकरी करत असून भविष्यात २००० जणांना नोकरी देण्याची हिंमत वीरेंद्र जगे यांच्यात असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# फुंडे येथे व्यसनमुक्तीसाठी विद्यार्थ्यांची सामूहिक शपथ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्रजापिता ब्रह्माकुमारीज, जेएनपीए वसाहत शाखेच्या सहकार्याने व्यसनमुक्त भारत या विशेष अभियानांतर्गत व्यसनमुक्ती शपथ व राजयोग ध्यान मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

प्रजापिता ब्रह्माकुमारीज संस्था नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत देशभरात युवक व विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती करत आहे; यासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता विभागाशी संस्थेने सामंजस्य करार करून समन्वयाने मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. याच अभियानाच्या अनुषंगाने कार्यक्रमात विद्यार्थ्यांना तंबाखू, दारू, ड्रग्ज आदी सर्व प्रकारच्या नशापदार्थांपासून कायम दूर राहण्याची शपथ घ्यायला लावण्यात आली आणि स्वतः व्यसनमुक्त राहून इतरांनाही



व्यसनातून बाहेर काढण्याचा संकल्प करायला प्रवृत्त केले.

सुंदर चरित्रावर आधारलेला व्यसनमुक्त समाज निर्माण करून, विश्वशांती, नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना आणि संस्कारवान तरुण घडवणे हा या संस्थेचा उद्देश असल्याचे संध्या दीदी यांनी सांगितले. राजयोग ध्यानाचे फायदे मेडिटेशनद्वारे तणावमुक्त, आनंदी जीवन, उच्च नीच रक्तदाब व हृदयरोगांपासून आराम, नकारात्मक विचारांपासून मुक्ती, नैराश्य व डिप्रेशनमधून सुटका, मूल्यमूलक शिक्षण व चरित्र निर्मिती, व्यसनांपासून मुक्ती, राग क्रोधावर नियंत्रण, कुटुंबातील सौहार्द, मानसिक ताणातून मुक्ती व स्वास्थ्यपूर्ण जीवन असे अनेक फायदे मिळत असल्याचे त्यांनी या प्रसंगी सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी राजयोगाच्या विशेष लाभ असून यात परीक्षा भीती कमी होणे, अभ्यासात एकाग्रता वाढणे, मनोबल विकास, स्मरणशक्ती वृद्धी, व्यक्तिमत्त्व घडण, अंतर्गत गुणांचा विकास घडून येतो असे त्या म्हणाल्या.

महाविद्यालयाच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारीज संस्थेचे आभार मानत भविष्यातही व्यसनमुक्ती, व्यक्तिमत्त्व विकास व मूल्य शिक्षणाशी निगडित अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## संपादकीय

# बदलते दहशतवादी स्वरूप

**भारताची राजधानी दिल्ली केवळ राजकीय सत्तेचे केंद्र नाही, तर ती इतिहास, संस्कृती आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहे. अशा राजधानीतील लाल किल्ला आणि प्रमुख मंदिरांना लक्ष्य करण्याचा इशारा समोर येणे गंभीर बाब आहे. या पार्श्वभूमीवर गुप्तचर यंत्रणांनी तातडीने पावले उचलत तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधून आठ संशयितांना अटक केली असून राजधानीत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांपैकी सहा जणांना तामिळनाडूतील उथुकुली, पल्लाडम आणि थिरुमुरुगनपुंडी येथून, तर उर्वरित दोघांना पश्चिम बंगालमधून ताब्यात घेण्यात आले. काही संशयित बांगलादेशी नागरिक असण्याची शक्यता आहे. त्यांचा पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि बांगलादेशातील कट्टरपंथी गटांशी कथित संबंध असल्याचा आरोप आहे. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेले मोबाईल फोन, सिम कार्डे आणि डिजिटल साधने यांचे विश्लेषण सुरू असून त्यामार्फत त्यांच्या जाळ्याचा आणि कथित परदेशी हँडलर्सचा शोध घेतला जात आहे. पारंपरिक पद्धतीऐवजी आता सोशल मीडियाद्वारे संपर्क, एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्सचा वापर, बनावट ओळखपत्रे आणि विविध राज्यांमध्ये विखुरलेले मॉड्यूल्स या माध्यमातून जाळे उभारले जात आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क, बनावट कागदपत्रांचा वापर आणि संवेदनशील स्थळांची रेकी या सर्व बाबी आधुनिक दहशतवादाच्या बदलत्या स्वरूपाची साक्ष देतात. या प्रकरणात पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचे नाव पुढे येत आहे. यापूर्वीही राजधानीने दहशतवादी घटनांचा सामना केला आहे. त्यामुळे सुरक्षाव्यवस्था कडक करणे, गुप्तचर यंत्रणांमधील समन्वय वाढवणे आणि डिजिटल माध्यमांवर लक्ष ठेवणे ही काळाची गरज आहे. या घटनेचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक सलोखा. दहशतवादी कटांचा उद्देश समाजात अविश्वास, भीती आणि धार्मिक ध्रुवीकरण निर्माण करणे हा असतो. अशा वेळी राजकीय पक्ष, माध्यमे आणि समाजनेते यांनी जबाबदारीने भूमिका घेतली पाहिजे. अफवा, अप्रमाणित माहिती आणि उत्तेजक वक्तव्ये टाळणे अत्यावश्यक आहे. देशाची ताकद त्याच्या विविधतेत आणि ऐक्यात आहे, ही जाणीव अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे. सुरक्षा ही केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर नागरिकांची सजगतादेखील तेवढीच आवश्यक आहे. संशयास्पद हालचालींची माहिती त्वरित प्रशासनाला देणे, सोशल मीडियावर जबाबदारीने वागणे आणि कायद्यावर विश्वास ठेवणाऱ्या गोष्टींमुळेच अशा कटांना वेळीच हाणून पाडता येईल. दिल्लीतील कथित कटाचा तपास अद्याप सुरू आहे. सत्य समोर येईल तेव्हा दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, परंतु त्याचवेळी समाजातील शांतता, सौहार्द आणि लोकशाही मूल्ये अबाधित ठेवणे हीही तितकीच मोठी जबाबदारी आहे. दहशतीच्या सावटाखाली घाबरण्याऐवजी सजग, संयमी आणि एकजुटीने उभे राहणे हीच या प्रसंगाला योग्य प्रत्युत्तर ठरेल. धार्मिक भावना चिथावून सामाजिक तणाव निर्माण करणे, देशांतर्गत अस्थिरता वाढवणे आणि भारताची प्रतिमा मलिन करणे हे अशा कटांमागील संभाव्य उद्दिष्ट असू शकते. भारताने आधीही आंतरराष्ट्रीय मंचांवर सीमापार दहशतवादाचा मुद्दा ठामपणे मांडला आहे. अशा नव्या कटांच्या उघडकीमुळे पुन्हा एकदा कठोर राजनैतिक पावले उचलण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो.

# भारतीय संस्कृतीचा गौरव श्री गुरु तेगबहादुर साहिब



'हिंद दी चादर', म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड आणि नागपूर येथे नुकताच भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ रोजी खारघर नवी मुंबई येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख:

सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. 'एकम सत् विप्रा बहुधा वदंती' म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत.

गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो.

### जन्म आणि पार्श्वभूमी

गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते 'आनंदपूर साहिब' म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचार-प्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत.

### साहित्य, उपदेश आणि आध्यात्म

गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम 'सिमरन' (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः 'शबद' किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मन-शरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो.

### संघर्षाचा कालखंड

गुरु तेगबहादुर सिंह साहीब यांच्या जीवनकार्याचा हा कालखंड भारतीय इतिहासातील अत्यंत आव्हानात्मक असा काळ मानला जातो. परकीय आक्रमकांनंतर दाखल झालेल्या तत्कालीन शासकांची सत्ता भारताच्या बऱ्याच भागात स्थिरावली होती. या सत्तेच्या कट्टरतेचा आणि आक्रमक विस्ताराचा असा काळ होता. मध्ययुगातील हाच काळ तत्कालीन शासकांच्या जुलमी राजवटीचाही मानला जातो. सत्ताधीश हे धार्मिकदृष्ट्या संकीर्ण आणि अत्यंत कडव्या मनोवृत्तीचे होते, असे इतिहास सांगतो. त्यामुळे स्वाभाविकपणे अन्य समुदायांसाठी हा काळ अतिशय खडतर आणि अस्थिरतेने परिपूर्ण असा काळ मानला जातो. अशा या प्रतिकूल परिस्थितीत गुरु तेगबहादुर यांनी अत्याचाराचा प्रतिकार अत्याचाराने नव्हे तर त्यागाने केला.

### सर्वोच्च बलिदान

गुरु तेगबहादुर साहीब यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सर्वोच्च बलिदान. साधरणतः १६७५ सालचा तो काळ होता. सत्ताधाऱ्यांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या काश्मिरी पंडिताचे काही प्रतिनिधी आनंदपूर साहीब येथे गुरु तेगबहादुरांकडे मदत मागण्यासाठी आले होते. या लोकांना सक्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात होते. काश्मिरी पंडितांची ही व्यथा ऐकून गुरु तेगबहादुर साहीब अतिशय धीरगंभीर झाले होते. अशा संकटापासून वाचण्यासाठी आता बलिदानाची गरज आहे, असे उत्तर त्यांनी यावर दिले. 'जर आमच्या गुरुंनी धर्मांतर केलं, तर आम्ही सर्व स्वतःहून तुमचा धर्म स्वीकारू', असे सत्ताधीशाला जाऊन सांगण्याची सूचना त्यांनी केली. पुढे गुरु तेगबहादुर साहीब हे दिल्लीला पोहचल्यावर बादशहाने त्यांना कैद केले. त्यांना प्रलोभने दाखविली गेली, धर्म स्वीकार करण्यास सांगण्यात आले. गुरुजींनी या दोन्ही गोष्टी नाकारल्या. त्यांच्या समक्षच त्यांच्या शिष्यांना शहीद करण्यात आले. पण, गुरु तेगबहादुर साहीब हे आपल्या निश्चयापासून अजिबात ढळले नाहीत. त्यांनी बादशहाचे आदेश मानण्यास नकार दिला. संतापलेल्या बादशहाने त्यांचे शीर धडावेगळे करण्याचे आदेश दिले. तो आदेश अखेर अंमलात आणला गेला. गुरु तेगबहादुर साहीब यांचे सर्वोच्च बलिदान ज्या ठिकाणावर झाले, ते ठिकाण आज दिल्लीच्या चांदणी चौक परिसरातील 'सीस गंज साहिब' गुरुद्वारा म्हणून ओळखले जाते.

'जर माझ्या बलिदानानं निरपराध लोकांच्या श्रद्धेचं रक्षण होणार असेल, तर तेच माझं सर्वोच्च धर्मकार्य ठरेल', असा संदेश त्यांनी त्यावेळी दिला होता. हे शब्द केवळ त्यागाचे नव्हते, तर संपूर्ण मानवतेच्या रक्षणाची घोषणा करणारे होते. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेची सर्वोच्च मूल्य जपण्यासाठीच त्यांनी हा निर्णय घेतला होता. 'सीस गंज साहिब' गुरुद्वारा आजही त्यांचा त्याग आणि मानवतेप्रती समर्पणाची साक्ष देतो.

### मानवतेचा संदेश

शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.

**-रमाकांत दाणी,**
प्रसिद्धी समन्वयक,
संचालक माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर.

## बदलते तंत्रज्ञान

# आवडत्या युट्यूब व्हिडीओचे करा जीआयएफमध्ये रूपांतर

सध्या व्हॉट्सॲप इन्स्टाग्रामवर एका फीचरचा खूप उपयोग केला जातो तो म्हणजे 'जिआयएफ'चा. तुमच्या मनातील भावनादेखील या मजेशीर या माध्यमातून तुम्ही व्यक्त करू शकता. त्यामुळे अतिशय छोट्या आकाराच्या व काही सेकंदांच्या या गमतीशीर क्लिप सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय आहेत. तुमच्या आवडत्या युट्यूब व्हिडीओचा जिआयएफ फाइल कशा बनवायच्या याचे काही टूल्स आपण पाहणार आहोत.





इंटरनेटवरील सर्वांत लोकप्रिय वेबसाइट्सपैकी एक आहे, जी तुम्हाला युट्यूब आणि Vimeoचे व्हिडीओ जीआयएफमध्ये रूपांतरित करू देते. व्हिडीओव्यतिरिक्त हे तुम्हाला फोटोमधून जीआयएफ आणि स्टिकर्सदेखील तयार करून देईल, पण या वेबसाईटचा वापर करणाऱ्या युजर्सना सर्वप्रथम त्यांचा ई-मेल आयडी वापरून साइन अप करणे आवश्यक आहे.

प्रथम GIPHY या वेबसाइटवर जा आणि तेथील क्रिएट या बटणावर टॅप करा. तुमच्यासमोर एक पेज येईल तिथे तुमच्या आवडीच्या युट्यूब व्हिडीओची कॉपी केलेली युआरएल पेस्ट करा आणि एंटर दाबा. आता एक नवीन विंडो तुमच्यासमोर येईल. तिथे तुम्ही व्हिडीओ ट्रीम करू शकाल आणि तुम्हाला व्हिडीओमधील कोणता भाग (पार्ट) जीआयएफमध्ये रूपांतर करायचा आहे ते निवडा. Continue या बटणावर क्लिक करा आणि प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही काळ प्रतीक्षा करा. तुम्ही या जीआयएफमध्ये तुमच्या आवडीचे इफेक्ट्ससुद्धा देऊ शकता. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर 'Continue to Upload' किंवा डाउनलोड बटण दाबा. त्यानंतर तुम्हाला एक नवीन स्क्रीन दिसेल, जिथे तुम्ही टॅग ॲड करू शकता, सोर्स युआरएल जोडू शकता किंवा अल्बममधील जीआयएफदेखील जोडू शकता.

फक्त जीआयएफ बनवण्यासाठी तुम्हाला ई-मेल आयडी वापरून साइन अप करायचे नसेल तर GifRun वापरून पाहा. फ्री-टू-युज सेवेचा वापर करून जीआयएफ GIF बनवण्यासाठी युजर्सना Gifrun.comवर जावं लागेल. तिथे दिसणाऱ्या एका वरच्या पट्टीवर तुम्हाला युट्यूब व्हिडीओ लिंक पेस्ट करावी लागेल. स्क्रीनवर उजव्या बाजूला जीआयएफ हे बटण दाबा आणि काही वेळ प्रतीक्षा करा. प्रोसेस पूर्ण झाल्यावर नवीन जनरेट झालेल्या जीआयएफची रुंदी, फ्रेम रेट निवडा आणि मजकूर लिहा. तुम्ही ते त्याच विंडोमधून डाउनलोडसुद्धा करू शकणार आहात.

# समाजसुधारक संत गाडगे महाराज



## निमित्त

ईश्वर कशात आहे ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा.

तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे; सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका अशी शिकवण आयुष्यभर गाडगेबाबांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

गाडगे महाराजांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांच्या आईच्या माहेरी मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे म्हणजेच मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी राखायला त्यांना फार आवडे.त्यांचे वडील झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते.

डेबूजी लहान असतानाच त्यांचे वडील दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. डेबूजींची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या, पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले.

घरादाराचा त्याग करून गाडगेबाबांनी संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना 'गाडगेबाबा' म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. अशा या महात्म्याचे २० डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चहा-कॉफीचे व्यसन शरीरासाठी घातक!

चहा आणि कॉफी या दोन्हींमधील मुख्य घटक असलेले कॅफिन हे मध्यवर्ती मज्जासंस्था उत्तेजित करते. हे सुरुवातीला ऊर्जा आणि सतर्कता वाढवते, परंतु या उत्तेजक पेयाचे जास्त प्रमाणातील सेवनाने आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.



चिंता आणि अस्वस्थता : हृदयात धडधड आणि अस्वस्थता ही सर्व अतिउत्तेजित मज्जासंस्थेची लक्षणे आहेत. कॅफिनमुळे कॉर्टिसॉल, तणाव संप्रेरक शरीरात सोडले जाते, ज्यामुळे चिंता वाढू शकते आणि अस्वस्थता जाणवू शकते.

झोपेचा त्रास : कॉफी वा चहा यापैकी कोणतेही पेय तुमच्या झोपणे व उठणे यांच्या चक्रात व्यत्यय आणू शकते, ज्यामुळे झोप लागणे आणि झोपणे अवघड होते. परिणामी दिवसभरात थकवा, चिडचिडेपणा येऊन एकाग्रता कमी होऊ शकते.

डोकेदुखी आणि मायग्रेन : कॅफिनमुळे होणारी डोकेदुखी ही चहा-कॉफीचे अतिसेवन करणाऱ्या लोकांची एक सामान्य तक्रार आहे. नियमित सेवनानंतर अचानक कॅफिन कमी केल्यास काही व्यक्तींना मायग्रेनचा त्रास होऊ शकतो.

पाचक समस्या : कॅफिनमुळे पोटाच्या समस्या होऊ शकतात; ज्यामुळे छातीत जळजळ, पित्त उसळणे व अतिसारदेखील होतो.

उच्च रक्तदाब आणि हृदयाची धडधड : काही व्यक्तींमध्ये कॅफिनचे जास्त सेवन केल्याने रक्तदाब आणि हृदयाची गती तात्पुरती वाढू शकते.

नकारात्मक परिणाम : कॅफिनवर जास्त अवलंबून राहिल्याने तुमच्या मानसिक आणि भावनिक आरोग्यावरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

व्यसनाधीनता आणि अवलंबून राहणे : कॅफिन हे सौम्य व्यसन म्हणून ओळखले जाते आणि नियमित अतिसेवनामुळे तुम्ही त्यावर अवलंबून राहू शकता. जेव्हा तुम्ही सेवन कमी करण्याचा प्रयत्न करता, तेव्हा तुम्हाला डोकेदुखी, थकवा व चिडचिड यांसारखी लक्षणे जाणवू शकतात.

तणाव हाताळण्याची क्षमता कमी होणे : एक कप कॉफीमुळे तणावातून तात्पुरती सुटका झाल्यासारखे वाटू शकते, परंतु दीर्घकाळ कॅफिनचा वापरामुळे तुमच्या शरीराची दीर्घकाळासाठी तणाव हाताळण्याची क्षमता कमी होऊ शकते.

भावनिक नियंत्रण बिघडणे : अतिसेवनामुळे भावनिक प्रतिक्रिया बिघडू शकते, ज्यामुळे तुम्हाला राग, निराशा ही भावना जाणवण्याची अधिक शक्यता असते.

# पशुपालकांना खेळत्या भांडवलावरील व्याजात चार टक्के सवलत; राज्य सरकारचा मोठा निर्णय

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने पशुसंवर्धन क्षेत्राला मोठा बुस्टर डोस दिला आहे. पशुपालन व्यवसायाला 'कृषी समकक्ष दर्जा' मिळाल्यानंतर आता किसान क्रेडिट कार्ड धारक पशुपालकांना त्यांनी घेतलेल्या अल्पमुदतीकर्जाच्या (खेळत्या भांडवलाच्या) व्याजदरात ४ टक्के सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पशुसंवर्धन विभागाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

निती आयोगाच्या शिफारशीनुसार आणि महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेच्या आराखड्यानुसार, कृषी व संलग्न क्षेत्रातील उत्पन्न वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पशुपालन व्यवसायातील अडचणी दूर करून पशुजन्य उत्पादनांची मूल्यवर्धन साखळी निर्माण करणे, हा यामागील मुख्य हेतू आहे.

पशुपालनाला 'कृषी समकक्ष दर्जा' मिळाल्याने आणि व्याजात ४% सवलत लागू झाल्याने पशुपालकांचा आर्थिक भार कमी होईल. यामुळे पशुपालकांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढेल आणि पर्यायाने जिल्ह्याच्या उत्पादनात मोठी भर पडेल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रायगड यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ १२ फेब्रुवारी २०२६ पासून घेतलेल्या कर्जांना लागू होणार आहे. राष्ट्रीयकृत बँका, खासगी, ग्रामीण आणिसहकारी बँकांमार्फत घेतलेल्या कर्जावर ही सवलत मिळेल.योजनेच्या अंमलबजावणीतयेणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा उपनिबंधकांशीसमन्वय साधावा

### कोण ठरणार पात्र?

**या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने काही ठराविक अटी निश्चित केल्या आहेत: अनुदान मुक्त: लाभार्थ्याने केंद्र, राज्य किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही इतर अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा. नोंदणी: सर्व पशुधनाची 'भारत पशुधन' पोर्टलवर नोंदणी असणे अनिवार्य आहे.योजनेचा लाभ ठराविक मर्यादेतील पशुधनासाठी मिळेल: कुक्कुटपालन: २५ हजार मांसल किंवा ५० हजार अंडी देणारे पक्षी., दुधाळ जनावरे: १०० किंवा त्यापेक्षा कमी जनावरांचा गोठा., शेळी-मेंढी: ५०० किंवा त्यापेक्षा कमी संख्या., वराह: २०० किंवा त्यापेक्षा कमी. परतफेड: घेतलेल्या कर्जाची परतफेड १ वर्षाच्या आत करणे आवश्यक आहे.**

# माणगाव बायपास ठेकेदार कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण

## ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर व माणगाव बायपासचे काम एल. एन. ए. इन्फा प्रोजेक्ट प्रायवेट लिमिटेड कंपनी करते. त्यांनी खंडणी देण्यास नकार दिला म्हणून या कंपनीच्या कर्मचाऱ्याला मारहाण झाल्याची घटना दि. २१ फेब्रुवारी रोजी घडली आहे.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार पवनकुमार गोवर्धनसिंह खिचड, वय ३३ वर्ष, हे मौजे नाणोरे गावच्या हद्दीतील एल. एन. ए. इन्फा प्रोजेक्ट प्रायवेट लिमिटेड येथील कॉन्फरस हॉलमध्ये एकटेच बसले असताना आरोपी योगेश लाड व त्याच्या सोबत ९ ते १० इसम तक्रारदार यांची पूर्व परवाणागी न घेता कॉन्फरस हॉलमध्ये आले. मुंबई गोवा हायवे रोडचे इंदापुर बायपास ते माणगाव बायपासचे काम चालु ठेवण्यासाठी व खर्डी क्रशर करीता ब्लास्टींग करणेसाठी तक्रारदार यांच्याकडे महिण्याला तीन लाख रुपये खंडणीची मागणी केली असता, त्यावेळी पवनकुमार यांनी खंडणी देण्यास नकार दिला.

त्यावेळी आरोपी योगेश लाड व त्याच्या सोबत ९ ते १० लोकांनी ऑफीसमध्ये तसेच आफीसचे बाहेर तक्रारदार यांना शिवीगाळ करुन हाताबुक्यानी मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच झालेल्या झटापटीमध्ये तक्रारदार याचे गळयातील सुमारे ८ तोळे वजनाची सोन्याची चैन व शर्टच्या वरच्या खिशातील २०हजार रुपये कोठेतरी पडुन गहाळ झाले.

# दारूमाफियाला पाठलाग करून पोलिसांनी पकडले; लाखाचा मुद्देमाल हस्तगत



**खोपोली चौक: प्रतिनिधी**

गावठी हातभट्टीची दारू किरकोळ विक्रेत्यांना पुरवणारा दिनेश नारायण नरे वय ५२ वर्ष रा.वरने ता.कर्जत या दारू माफियाला स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस पथकाने फिल्मी स्टाईल पाठलाग करून अटक केली आहे .त्याच्याकडून २४० लिटर हातभट्टीची दारू आणि एक कार असा सुमारे एक लाख एकोणीस हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

खालापूर तालुक्यात गावठी हातभट्टी दारूचा पुरवठा कर्जत येथील दिनेश नरे हा करत असल्याची खात्रीलायक माहिती पोलीस हवालदार रणजीत खराडे यांना मिळाली होती .मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगडचे पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी पहाटे सापळा रचण्यात आला.

दिनेश हा त्याच्या ताब्यातील कार घेऊन सावरोली खारपाडा गावाच्या हद्दीत कुंभिवली येथून जात असताना पोलिसांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु दिनेशने अधिक वेगाने कार घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करताच पोलिसांनी पाठलाग करून दिनेशला जेरबंद करत कारची तपासणी केली असता त्यामध्ये गावठी हातभट्टीची दारू मिळून आली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील ,सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस हवालदार शरद फरांदे ,रणजित खराडे, शिपाई प्रदीप खरात यांची महत्त्वाची भूमिका होती.

# पत्रकारांच्या सुविधांसाठी केंद्र स्तरावर प्रयत्न करणार- खासदार श्रीरंग बारणे



**कर्जत : प्रतिनिधी**

'पत्रकारांच्या विविध सेवा, प्रवास योजना यासाठी दिल्लीच्या केंद्र स्तरावर आपण प्रयत्न असून पत्रकारिता करणे खूप कठीण काम आहे. प्रसंगी जीवाची पर्वा न करता बातम्या संकलित करण्याचे काम पत्रकार करीत असतात. समाजासाठी त्यांनी वाहून घेतले असून अनेक उपक्रम करून सामाजिक कार्य करण्याचे काम ते करीत आहेत.' असे प्रतिपादन असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी कर्जत येथील पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळ्या निमित्ताने केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आयोजित, रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन कर्जत प्रेस क्लबच्या वतीने कर्जत येथील रॉयल गार्डन सभागृहात करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, किरण नाईक, परिषदेचे कार्यध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई, पत्रकार मंदार फणसे, परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज काटकर, डिजिटल मीडियाचे अध्यक्ष अनिल वाघमारे, रायगड प्रेस क्लब चे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्यध्यक्ष संजय मोहिते, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, माजी अध्यक्ष भारत रंजणकर, कोकण विभाग अध्यक्ष अनिल भोळे आदी उपस्थित होते.

कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार, दर्वेश पालकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माजी अध्यक्ष ॲड. राहुल देशमुख यांनी प्रस्ताविकात कर्जत प्रेस कलबच्या उपक्रमांची माहिती सांगितली. प्रमुख पाहुणे हेमंत देसाई यांनी 'पत्रकारांनी आपली शोध पत्रकारिता अखंड चालू ठेवायला हवी मात्र यात आपण कमी पडलो त्याचा फायदा पुढारी नेते घ्यायला लागतात. पत्रकारांनी जे जे नवीन साधन येईल ते ते शिकायला हवे. पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे योगदान भरीव आहे त्यासाठी एस एम देशमुख यांचे प्रयत्न अफाट आहेत.' असे सांगितले. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने यावर्षी दिल्या गेलेला पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ म्हणून जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार यंदा परभणी जिल्हा पत्रकार संघाला मान्यवराचे हस्ते देण्यात आला.

### तालुकास्तरीय वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार

***– नागपूर विभाग : बेला तालुका पत्रकार संघ जिल्हा नागपूर नागपूर विभाग : चामोर्शी तालुका पत्रकार संघ, जि.गडचिरोली नाशिक विभाग–: नांदगाव – मनमाड मराठी पत्रकार संघ जिल्हा नाशिक कोंकण विभाग : पनवेल महानगर प्रेस क्लब जि. रायगड पुणे विभाग : आंबेगाव तालुका पत्रकार संघ जि. पुणे लातूर विभाग : किनवट तालुका पत्रकार संघ जि. नांदेड, संभाजीनगर विभाग : अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ जि.बीड अमरावती विभाग : संग्रामपूर तालुका पत्रकार संघ जि.बुलढाणा कोल्हापूर विभाग : पलूस तालुका मराठी पत्रकार संघ जि. सांगली मुंबई विभाग : मुंबई उपनगर पत्रकार संघ,***

# नागोठण्यातील नामयज्ञ सोहळ्यास राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन यांची भेट

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिर परिसरात सालाबादप्रमाणे शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान अखंड नामयज्ञ सोहळ्याचा भक्तिमय व उत्साही वातावरणात शुभारंभ झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला असून पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेत आहेत.



रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन व संगिता किशोर जैन यांनी सोहळ्यास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी सकाळच्या नाश्त्याचाही लाभ घेतला. राष्ट्रवादीचे निष्ठावंत कार्यकर्ते भारत भोय यांच्या पुढाकारातून नागोठण्यातील प्रसिद्ध कॅटरर्स दत्ता रजिवले यांच्या मार्फत चविष्ट बटाटा भाजी व पुरीचे नियोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी हभप विजय महाराज शहासने यांच्या हस्ते संत सेवा मंडळ ज्ञानेश्वर मंदिर, नागोठणे यांच्या वतीने किशोर जैन यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संत सेवा मंडळ नागोठणेचे अध्यक्ष शैलेश रावकर, माजी अध्यक्ष रतन हेंडे, उदंड रावकर, भारत भोय, दिगंबर खराडे, जनार्दन सकपाळ यांच्यासह अनेक मान्यवर व भाविक उपस्थित होते.

# दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी वाहनाची मोफत व्यवस्था

**खोपोली : प्रतिनिधी**

दहावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा नुकतीच सुरू झाली असून, श्री शिव छत्रपती विद्यालय देवन्हावे या शाळेतील विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेसाठी खोपोली येथे परीक्षेसाठी वेळेवर पोहचता यावे.या उदात्त विचारातून अभि युवा ग्रुप देवन्हावेचे ड.जयेश तावडे व सर्वं सदस्यांनी परीक्षा सुरू असे पर्यंत करण्यात आली.तसेच परीक्षा केंद्रातून घरी सोडविण्यात येत आहे. हा उपक्रम गेली नऊ वर्ष सुरु असलेले सांगण्यात आले.



याबाबत अभि युवा ग्रुप देवन्हावेचे ड.जयेश तावडे यांनी सांगितले की, श्री शिव छत्रपती विद्यालय देवन्हावे या शाळेत ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिकण्यासाठी येत असतात.प्रत्येकाची परस्थिती घरची उत्तमच असते असे नाही. आम्हाला सुद्धा १० वी ची परीक्षा देण्यासाठी खूप समस्या येत होत्या.त्यांची जाणीव मनामध्ये गेली ८ ते ९ वर्ष हा उपक्रम सुरु आहे.यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर शालेत जाता येते, किंवा घरी येवू शकतो यामुळे हा उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले

यावेळी श्री शिव छत्रपती विद्यालय देवन्हावेचे मुख्याध्यापक कचरू चौधरी सर, यशवंत पाटील, अभि युवा ग्रुपचे सदस्य देवेश तावडे, ड.जयेश तावडे,जयेश पालांडे, ओंकार वाणी, विलास दाबके, पुंडलिक पाटील, राजा पाटील तसेच मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते.त्याच बरोबर प्रथम पेपर च्या वेळेस मुलांना काही सूचना देऊन त्यांचे पेढे, पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीसाठीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांस शुभेच्छा दिल्या.

# गटविकास अधिकारी संदीप कराड यांचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

गटविकास अधिकारी संदीप कराड यांना माझी वसुंधरा अभियानात संपूर्ण राज्यात प्रथम आल्या बद्दल पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुंबई येथे सन्माननीत करण्यात आल्याने खालापूर तालुक्याची मान

उंचावली आहे.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा राज्य सरकार यांच्या वतीने घेण्यात आली होती. ही स्पर्धा लोक संख्येच्या आधारावर चार गटात घेण्यात आली होती. खालापूर गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी स्वतः सर्व ४५ ग्राम पंचायत यांना भेटी देऊन सर्वांशी व्यक्तिगत संवाद साधला होता.प्रत्यक अभियानाची माहिती त्यांनी दिली होती.सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान करण्यात आला.रायगड जिल्ह्यात एकूण ५५ ग्राम पंचायत यांचे नामांकन झाले होते,खालापूर तालुक्यातील ४५ पैकी ४५ ग्राम पंचायत यांचे नामांकन झाले होते.

यापैकी आठ ग्राम पंचायत यांना नऊ पुरस्कार प्राप्त झाले असून दोन ग्राम पंचायत यांना राज्य पातळीवर प्रथम तर सहा ग्राम पंचायत विभाग स्थरावर प्रथम आल्या. ग्रुप ग्रामपंचायत शिरवली व ग्रुप ग्रामपंचायत वडगांव या राज्यात प्रथम येऊन प्रत्यकी एक कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले आहे.

माझी वसुंधरा अभियानामध्ये खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायती राज्य व विभागात अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे स्वच्छता प्रदूषण स्वच्छ पाणी याबाबत सातत्याने चांगले काम करण्यात येत आहे, माझी वसुंधरा अभियानाची राज्यात सुरुवात झाली, तेंव्हा गट विकास अधिकारी संदीप कराड हे नाशिक जिल्ह्यात निफाड येथे कार्यरत असताना त्यांनी माझी वसुंधरा अभियान १.०, माझी वसुंधरा २.० व माझी वसुंधरा अभियान ३.० यात बक्षीस जिंकले असून राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला होता, तर माझी वसुंधरा ४.० यातही खालापूर तालुक्यातील तीन ग्राम पंचायत यांना राज्य स्तरीय पुरस्कार मिळाला होते. माझी वसुंधरा ५.० यात खालापूर तालुक्यातील दोन राज्य स्थतीय व सहा ग्राम पंचायत यांना विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने सातत्याने त्यांनी यश मिळवले आहे.

यापुढेही अशाच प्रकारे काम सुरू राहणार असून शासन स्तरावरून नागरिकांना चांगल्या सुविधा देण्याचे काम केले जाईल असे त्यांनी सांगितले.या सर्व विजेत्या ग्रामपंचायतींचे व गटविकास अधिकारी श्री. संदिप कराड यांचे विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, नरेगा आयुक्त महाराष्ट्र राज्य डॉ.भारत बास्टेवाड, व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांनी अभिनंदन केलेले आहे


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ८०/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण वाहिनीची देखभाल व दुरूस्ती... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील विद्यमान ६३० मिमी व्यासाच्या एचडीपीई सांडपाणी निःसारण वाहिनीवर तातडीचे देखभाल दुरूस्तीचे कामे करणे. | ₹ ४०,०३,३५६.०० |
| २ | रानसई पाणीपुरवठा योजना... रानसई जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर बेड क्रमांक २ च्या ड्रेन सिस्टीम अंतर्गत विद्यमान एसएस व्ही-वायरचे पुनर्गठन व अनुषंगिक कामे करणे. | ₹ ३९,८५,५९५.०० |
| ३ | पेण अलिबाग व नागोठाणे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाणीपुरवठा योजनेत बसवलेल्या सर्ज अरेस्टर व्हॉल्व्हची दुरुस्ती आणि ओव्हरहोलिंग. | ₹ २१,१३,०००.०० |
| ४ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती...... तळोजा अग्निशमन केंद्रातील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांच्या इमारतींचे दुरुस्तीचे काम करणे. | ₹ ४०,०१,२७०.०० |
| ५ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती..... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील मुख्य सिमेंट सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या मध्यवर्ती कडांचे नुकसान झालेल्या कर्बची पुनर्बांधणी व दुरुस्ती करणे. | ₹ ४०,०१,७०८.०० |
| ६ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या शुद्धजल उदंचन केंद्रातील एचटी व्हीसीबी आणि एलटी इनकमर वितरण पॅनेलचे बळकटीकरण करणे. | ₹ ३६,९३,०४४.०० |
| ७ | पाताळगंगा येथील नविन व जुन्या जलशुद्धीकरण केंद्राची देखभाल व दुरूस्ती...... पाताळगंगा येथील विविध ठिकाणच्या विविध आकारांच्या एमएस/सीआय/डीआय पाणीपुरवठा जलवाहिनीवरील ब्रेकडॉऊन अटेंड करणे. | ₹ ३९,४४,८१८.०० |
| ८ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारत व अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती....... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सुविधा केंद्र इमारतील व अग्निशमन केंद्रातील इलेक्ट्रिक फिटिंग व ॲक्सेसरीजची दुरुस्ती करणे. | ₹ १२,९०,५५६.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २४/०२/२०२६ ते दिनांक १०/०३/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २७/०२/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०५/०३/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# हिरवळ, टेकडी वाचवण्यासाठी मानवी साखळी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाढत्या भूस्खलन धोक्याचा इशारा देत सुमारे २०० नागरिक आणि पर्यावरणवादी संघटनांनी रविवारी (दि.२२) सकाळी बेलापूरच्या मुख्य चौकात तिसरी मानव साखळी तयार केली. अनियंत्रित आणि कथित बेकायदेशीर बांधकामांपासून संवेदनशील बेलापूर टेकड्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी आपला लढा तीव्र केला.




सेव्ह बेलापूर हिल्स फोरम आणि नॅटकनेक्ट फाउंडेशन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात भूस्खलनप्रवण उतारांवर उभ्या असलेल्या सुमारे ३० अनधिकृत बांधकामांविरोधातील प्रशासनाच्या दीर्घकालीन निष्क्रियतेचा मुद्दा मांडण्यात आला.

आरटीआयमार्फत सिडकोकडून मिळालेल्या माहितीनुसार ही बांधकामे सुमारे २.३ लाख चौरस फूट सार्वजनिक जागेवर पसरलेली आहेत. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून जमीन सपाट केल्यामुळे टेकडीची माती सैल झाली आहे.

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगासमोर दिलेल्या पाडकामाच्या आदेशांनंतरही ही बांधकामे उघडपणे वाढत असल्याचा कार्यकर्त्यांचा आरोप आहे. सिडको मुख्यालयातून स्पष्ट दिसणाऱ्या या टेकड्या आता प्रशासकीय ठप्पपणाचे प्रतीक बनल्या आहेत.

गेल्या दोन वर्षांत हे तिसरे आंदोलन आहे. एप्रिल २०२४ मध्ये वृक्ष उत्पाटनानंतर भूस्खलनाच्या धोक्याकडे लक्ष वेधण्यासाठी आणि फेब्रुवारी २०२५ मध्ये आयोगाच्या निर्देशांचे पालन न झाल्याच्या निषेधार्थ मानव साखळी करण्यात आली होती.

टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांनी मुसळधार पावसात माती घसरणे, रिटेनिंग वॉल कोसळणे आणि दगड खाली घसरल्याच्या घटना नोंदवल्या आहेत. सेव्ह बेलापूर हिल्स फोरमचे कपिल कुलकर्णी यांनी सांगितले की, ६००हून अधिक घरे थेट या धोकादायक उतारांच्या खाली आहेत.

आम्ही कोणत्याही रचना किंवा समुदायाच्या विरोधात नाही. आमची चिंता सुरक्षेबाबत आहे. येथे येणाऱ्या भाविकांची आणि टेकडीखाली राहणाऱ्या कुटुंबांची, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले. श्रद्धेला सुरक्षित जागा हवी, अस्थिर उतार नव्हे.

पर्यावरणवाद्यांनी १९ जुलै २०२३ रोजी रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथे झालेल्या भूस्खलनाचा उल्लेख केला, ज्यात संपूर्ण गाव वाहून गेले आणि ८४ जणांचा मृत्यू झाला. वेळेत प्रतिबंधात्मक उपाय न केल्यास बेलापूरमध्येही तत्सम धोका संभवतो, असा इशारा त्यांनी दिला.

हिमालयातील अलीकडील आपत्तींचा दाखला देत त्यांनी सांगितले की अनियंत्रित डोंगराळ बांधकामे नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढवतात. हा प्रश्न २०१५ पासून प्रलंबित असल्याचे कार्यकर्ते सांगतात, जेव्हा सुरुवातीच्या बांधकामावेळी कारवाईचे आश्वासन देण्यात आले होते. दशक उलटूनही बांधकामांची संख्या लक्षणीय वाढल्याचा दावा करण्यात आला आहे.

उताराच्या काही भागांवर मोठी झोपडपट्टी उभी राहिल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबेही धोक्यात आली आहेत. धोका कोणालाही वेगळा पाहत नाही, कारण माती भेदभाव करत नाही, असे सजग नागरिक मंचचे सुधीर दाणी यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने नोव्हेंबर २०२२ मध्ये माध्यमातील वृत्तांवरून स्वतःहून दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांना समन्स बजावले होते. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांनंतरही कारवाई का होत नाही, असा सवाल आयोगाने उपस्थित केला आहे.

जुलै २०२४च्या पावसाळ्यात सुरू करण्यात आलेली पाडकाम मोहीम भूस्खलनाच्या भीतीमुळे अर्धवट थांबवण्यात आल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. पाणी व वीजपुरवठा खंडित करण्याच्या विनंत्याही कागदोपत्रीच राहिल्याचे ते म्हणाले.

रविवारी झालेल्या मानव साखळीला पुनर्वसु फाउंडेशन, खारघर वेल्फेअर असोसिएशन, निसर्ग फ्रेंडशिप क्लब (सुरेश थोरात व टीम), सानपाडा निसर्ग प्रेमी (श्री पाटकी), सेव्ह फ्लेमिंगो – रेखा सांखला व टीम (एनआरआय) आणि पारसिक ग्रीन्स यांनी पाठिंबा दिला.

### बेलापूरला आपत्तीपासून वाचवण्याची मागणी

मान्सूनजवळ येत असताना आणि मातीची स्थिरता ढासळत असताना त्यांचा संदेश स्पष्ट आहे. नो–डेव्हलपमेंट नियम कडकपणे लागू करा, धोकादायक बांधकामे सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करा आणि बेलापूरला आणखी एका टाळता येण्याजोग्या आपत्तीपासून वाचवा, असे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले.

# माझी वसुंधरा अमृत गटात नवी मुंबई राज्यात द्वितीय



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०' मध्ये नवी मुंबई महानगरपालिका १० लक्षपेक्षा अधिक लोकसंख्येच्या मोठ्या शहरांच्या अमृत गटात राज्यस्तरावर 'द्वितीय' क्रमांकाची मानकरी' ठरलेली आहे.

शनिवारी मुंबईमध्ये झालेल्या माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळ्यामध्ये नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी हा मानाचा पुरस्कार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्याहस्ते, विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्या प्रमुख उपस्थितीत स्विकारला. या वेळी व्यासपीठावर अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड तसेच अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, प्रवीण गाडे, राजेश पवार, यशवंत कापसे, दिपक सूर्यराव आणि अभियंता स्वप्निल देसाई उपस्थित होते.

याप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिकेस 'माझी वसुंधरा अभियान ४.०' आणि 'अभियान ५.०' असे मागील दोन्ही वर्षांचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. दोन्ही वर्षांत नवी मुंबई महानगरपालिका राज्यस्तरीय व्दितीय क्रमांकाची मानकरी ठरली आहे. याशिवाय 'अभियान ४.०' मध्ये 'भूमी थीमॅटीक' कॅटेगरीमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस राज्यस्तरीय सर्वोत्तम कामगिरीचे विशेष पारितोषिकही प्रदान करण्यात आले. अशाप्रकारे नवी मुंबई महानगरपालिकेस एकूण तीन पुरस्कार लाभले.

पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित 'माझी वसुंधरा अभियान' राबविण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेने यामधील प्रत्येक तत्वाशी निगडीत थिमॅटिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गतवर्षी अभियान ४.० मध्ये भूमी थिमॅटिक क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीचा पुरस्कार यावर्षी समारंभात प्रदान करण्यात आला.

सर्व क्षेत्रांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेची कामगिरी उल्लेखनीय ठरलेली आहे. या दोन्ही वर्षातील पुरस्कार या समारंभात प्रदान करण्यात आले.

# पनवेलमध्ये आरटीईच्या कक्षेत २६३१ विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

**खारघर : प्रतिनिधी**

प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार म्हणजे आरटीई प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. पनवेल तालुक्यात आरटीईच्या कक्षेत ११३ शाळा असून २५ टक्के कोट्यात २६३१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे.

११३ शाळांमध्ये नर्सरीकरिता तीन आणि पहिलीच्या प्रवेशासाठी ११० शाळा आहेत. मागील वर्षी अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा सुद्धा आरटीई वर दाखविण्यात आल्या. त्यातून अनेकजण कोर्टात जाऊन हा निर्णय शासनाला रद्द करायला लावला. मागील काही महिन्यांपासून अनेक इंग्रजी विनाअनुदानित शाळांना अल्पसंख्याक शाळा म्हणून दर्जा देत सुटली आहे, त्यामुळे ह्या कायद्यानुसार ज्या शाळा अल्पसंख्याक आहेत त्यात आरटीईचा कोटा नसतो. मागच्या वर्षापर्यंत शाळा निवड करताना १ किमी च्या आत, त्यानंतर १ ते ३ किलो मीटर आतील शाळा आणि त्यानंतर ३ किलोमीटरवरील शाळा असे पर्याय होते. त्यामुळे शाळेचे अनेक पर्याय उपलब्ध होते. या वर्षापासून फक्त घराच्या लोकेशन वरून १ किलोमीटर मधीलच शाळा दिसणार आहेत.

> **पनवेल तालुक्यात ११३ शाळा आरटीईच्या अखत्यारीत येत आहेत.२५ टक्केच्या कोट्यानुसार २६३१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे.**
> **–शाहू सतपाल**, गट शिक्षणाधिकारी, पनवेल पंचायत समिती

प्रत्येक किलो मीटरच्या परिघात शाळा नाही, त्यामुळे कमी शाळा दिसणार आणि ज्यांच्या वॉर्डात अथवा गावात शाळा नाही त्यांना आता ह्या आरटीई च्या नाईलाजास्तव बाहेर राहावे लागणार असल्याची भीती सामाजिक कार्यकर्ते चेतन वाघ यांनी व्यक्त केली आहे.

पनवेल तालुक्यात पनवेल महानगरपालिकेला स्वतंत्र शिक्षणाधिकारी आहेत, मात्र पालिका क्षेत्रातील शाळांवर शिक्षण विभागाचे कोणतेही थेट नियंत्रण नाही. आरटीई अंतर्गत पालिकेचे या शाळांवर थेट नियंत्रण नसल्याची माहिती पालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी दिले.

# लिमये महाविद्यालयात एनईपी ओरिएंटेशन सेन्सिटायझेशन कार्यशाळा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

सु.ए.सो.च्या शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये आर्ट्‌स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, कळंबोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने ' एनईपी ओरिएंटेशन अँड सेन्सिटायझेशन' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा महाविद्यालयात उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रिती महाजन या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. बी. बी. जाधव यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणारे धोरण असून शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्याची सखोल माहिती करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देशभरातील प्राध्यापकांसाठी दि. १६ ते २७ मार्च २०२६ मध्ये ऑनलाइन स्वरूपात याच विषयावर एफ. डी. पी. कोर्स घेणार असल्याचे सांगितले .



या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ आर. टी. बेद्रे, संचालक, यूजीसी–एमएमटीटी केंद्र सागर (म. प्र.) यां नी एनईपी २०२०: ध्येये, अंमलबजावणी धोरणे आणि आव्हाने या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाची उद्दिष्टे, बहुविषयक शिक्षण, संशोधनाला प्रोत्साहन, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर सविस्तर विवेचन केले. तसेच छश्झ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन केले. तसेच कोर्सबाबतही अधिक माहिती दिली.

दुसरे मार्गदर्शक म्हणून प्रा. (डॉ.) एन. सी. वडनेरे, नोडल अधिकारी – NEP, सी. के. टी. कॉलेज, नविन पनवेल यांनी एनईपी २०२०: तळागाळातील अंमलबजावणी धोरणे आणि आव्हानेया विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करताना येणारी आव्हाने, त्यावरील उपाययोजना अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडल्या. तसेच अभ्यासक्रम रचना, अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट, बहुविषयक शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. प्रिती महाजन यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगून शिक्षकांनी नवीन बदल स्वीकारून विद्यार्थ्यांच्या हितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा मॅडम व जोशीला मॅडम यांनी केले. तर आभार प्रा. मिलिंद सरांनी मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. संदीप पोंदे (नेरूळ) यांच्यासह विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे तांत्रिक सहकार्य मिसेस पूजा चंदे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन IQAC विभागामार्फत करण्यात आले.

कार्यशाळेमुळे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० बाबत उपस्थितांना सखोल माहिती मिळाली व त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिशा मिळाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

# नवी मुंबईत सहा ठिकाणच्या सखोल स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

सुपर स्वच्छ लीग मधील देशातील अग्रगण्य शहर म्हणून नावलौकिक असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत हिंद–दी–चादर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत असून त्याला नागरिकांचाही चांगला प्रतिसाद लाभत आहे.

या अनुषंगाने कोपरखैरणे नमुंमपा शाळा क्रमांक ३१ मध्ये, वाशी सेक्टर १० परिसरामध्ये, तुर्भे विभागातील सानपाडा गुरुद्वारा सेक्टर ९ परिसरामध्ये, सायन पनवेल महामार्गावरील बेलापूर भागात, ऐरोली सेक्टर –१ गुरुद्वारा परिसरात तसेच दिघा विभागातील विष्णुनगर व सभोवतालच्या डोंगर परिसरात विशेष स्वच्छता मोहीमा अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात आल्या.

स्वच्छ नवी मुंबई शहराचे मानांकन उंचाविण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने दैनंदिन स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात असतानाच २८ व १ तारखेला होणाऱ्या 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत. या मोहीमांमध्ये स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता दूत यांच्यासह तेथील नागरिकांचाही सहभाग लाभत आहे.

# अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने तुर्भे विभागात अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

या अनधिकृत बांधकामाला महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३(१) अन्वये नोटीस बजावण्यात आलेली होती. परंतु, सदर अनधिकृत बांधकामाचा वाणिज्य वापर सुरुच होता. त्याअनुषंगाने, अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कारवाई करून हे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आलेले आहे.

# नेरूळमध्ये प्रेम विषयावर रंगले कविसंमेलन




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भूमिपुत्र सामाजिक प्रतिष्ठान नवी मुंबई आणि नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेम विषयावर २१ फेब्रुवारी रोजी म्हात्रे नर्सरी नेरूळ येथे पार पडले. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी वैभव व–हाडी हे होते.

या कविसंमेलनात ज्येष्ठ कवी खंडू अडांगळे, अक्षता गोसावी, मिलिंद कल्याणकर, अनिल मुनघाटे, घनश्याम परकाले, विलास राजुरकर, महादेव देवळे, गज आनन म्हात्रे, धनंजय पाटील, प्रकाश पलांडे, सर्जेराव कुईगुडे यांनी आपल्या कविता सादर केल्या. कवी जितेंद्र लाड उपस्थित होते. वैभव वऱ्हाडी यांनी अध्यक्षीय भाषणात प्रेम विषयाचा आढावा घेतला. सुजल जाधव यांनी रंगतदार सूत्रसंचालन केले. सुभाष कोडोलकर यांनी आभार मानले.

# मालमत्ता करावरील शास्ती २०० टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेमध्ये शुक्रवारी २० फेब्रुवारी रोजी जनहिताचे निर्णय घेण्यात आले. महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेमध्ये आर्थिक वर्ष २०२६–२०२७ साठी कोणतीही करवाढ न करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. मालमत्ता करावरील शास्ती २०० टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणण्यात आली.

पालिका निवडणुकीमध्ये वनमंत्री गणेश नाईक यांनी शब्द दिला होता की, मागील वीस वर्षांप्रमाणेच पुढील वीस वर्षेदेखील नवी मुंबईकरांवर मालमत्ता आणि पाणीपट्टी वाढीचा बोजा पडू देणार नाही. त्याचबरोबर गरजेपोटीच्या घरांना आकारण्यात येणारी जाचक शास्ती रद्द करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. सभागृह नेते सागर नाईक यांनी शास्ती आकारण्याच्या प्रस्तावावर बोलताना सभागृहात सांगितले की, नैसर्गिक कुटुंब वाढ झाल्याने गाव, गावठाण आणि एलआयजीमध्ये वाढीव बांधकामे झाली. ही गरजेपोटीची बांधकामे आहेत, परंतु प्रशासनाने त्यांना अवैध ठरवून दुप्पट शास्ती आकारली जात आहे. त्यामुळे २००% शास्ती ऐवजी केवळ पाच टक्के शास्ती आकारण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

ज्येष्ठ सदस्य सुधाकर सोनवणे यांनी या प्रस्तावामध्ये झोपडपट्टी भागाचाही समावेश करण्याची सूचना केली. सदस्य भारती पाटील यांनी जाचक शास्तीमुळे एलआयजी सारख्या अल्प उत्पन्न बांधवांच्या डोक्यावर करव्याज वाढीचा डोंगर उभा राहिल्याचे सांगितले. या विषयावर भाजपच नेरूळचे नगरसेवक गिरीश म्हात्रे तर तुर्भे, कोपरी गाव येथील नगरसेविका शुभांगी पाटील यांनी देखील आवाज उठवला.

सदस्य सुरज पाटील यांनी नाईक यांच्यामुळे सर्वसामान्याना न्याय मिळत असल्याचे म्हटले. या प्रस्तावावर बोलताना नामदार गणेश नाईक यांचे नेतृत्व नवी मुंबईकरांचे स्वप्न सत्यात उतरवणारे नेतृत्व आहे, असे म्हटले. यापूर्वी महापालिका सभागृहाने केलेला ५०० चौरस फुटापर्यंत निवासी घरांना संपूर्ण कर माफीचा ठराव तसेच ५०१ ते ७०० पर्यंतच्या चौरस फूट निवासी घरांना ७५ टक्के कर सवलतीचा ठराव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. त्या संदर्भात राज्य शासनाला स्मरणपत्र देण्याची सूचना सभागृहनेते सागर नाईक यांनी केली. शासन दरबारी करमाफीचा आणि कर सवलतीचा प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांना विनंती करण्यात येणार आहे.

# पाली येथील डम्पिंग ग्राऊंडची दुरवस्था

## नागरिक आणि गुरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली येथील टेंबी व शिक्षक वसाहती जवळ असलेल्या डम्पिंग ग्राउंडची प्रचंड दुरवस्था झाली आहे. प्रदूषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय गुरांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे.

संरक्षक भिंत नसल्याने डम्पिंग ग्राउंडमधील कचरा मोठ्या प्रमाणावर अस्ताव्यस्त झाला आहे. रस्त्यावरदेखील आला आहे तसेच या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी हा कचरा जाळला जातो. परिणामी मोठ्या प्रमाणात वायु प्रदुषण होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. ओला व सुका कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणत्याच शास्त्रीय पद्धतीचा वापर होतांना दिसत नाही. किंवा कचऱ्यावर विलगीकरणाची प्रक्रिया देखिल केली जात नाही. परिणामी घंटा गाडी अथवा कचारा गाडीतुन

डंपिग ग्राऊंडमध्ये ओला-सुका कचरा एकत्रितरित्या गोळा करुन टाकला जातो. आणि तेथेच तो जाळला जातो. परिणामी सुका कचरा अनेक दिवस तशाच जळत राहतो त्यामूळे मोठया प्रमाणात विषारी धुर निर्माण होऊन वायु प्रदुषण होते. तसेच ओला कचरा न जळाल्याने तो तेथेच सडत राहतो त्यामुळे आजुबाजूच्या परिसरात प्रचंड दुर्गंध पसरते. या दुर्गंधी बरोबरच रोगराईचा प्रसार होतो. पावसाळ्यात हे दूषित पाणी मानवी वस्तीत शिरते.

या डंपिग ग्राऊंड जवळ शिक्षक वसाहत आणि इतर वसाहती आहेत. परिणामी येथील रहिवासी व ये-जा करणाऱ्यांना याचा त्रास होतो.



**डम्पिंग ग्राऊंड आद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये कंपोस्ट पिट्स (खत खड्डे) आणि एम.आर.एफ. शेडचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. कंपोस्ट खत खड्ड्यांचे काम पूर्ण होताच ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मितीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल. एम.आर.एफ. शेडमध्ये सुक्या कचऱ्याचे विलगीकरण केले जाईल, तसेच प्लास्टिक बेलिंग मशीनचा वापर करून प्लास्टिक कचऱ्याचे कॉम्प्रेस्ड बेल्स (गठ्ठे) तयार केले जातील. सुरक्षा भिंतीच्या (कंपाउंड) बांधकामासाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.**

**-माधुरी मडके,**
**मुख्याधिकारी, नगरपंचायत, पाली**

**या डम्पिंग ग्राउंडच्या प्रदूषणाकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळचे दुर्लक्ष आहे. नगरपंचायतने डम्पिंग ग्राउंड बंदिस्तीकडे दुर्लक्ष केल्यामुळे गुरांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहे. एकीकडे क्रीडा मैदानाला कोट्यवधीचा निधी आणि दुसरीकडे नागरिकांच्या व गुरांच्या आरोग्याकडे स्पष्टपणे दुर्लक्ष होत आहे. नगरपंचायत प्रशासन डम्पिंग ग्राउंड मध्ये लाखोंची कचरा विल्हेवाट लावण्याची यंत्रणा धुळखात ठेवून कचरा बेकायदेशीरपणे जाळून प्रदूषण करीत आहेत.**

**-कपिल पाटील,**
**सामाजिक कार्यकर्ते, पाली**

### प्लास्टिकमुळे गंभीर परिणाम

***गाय, बैल, म्हशी, कुत्रे तसेच कावळे हे पशुपक्षी डंपिंग ग्राऊंडमध्ये खाण्याचे काही मिळते का यासाठी फिरत असतात. आणि प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये टाकलेले अन्न पदार्थ तसेच पिशवी सकट खातात त्यामुळे त्यांचेही आरोग्य धोक्यात येत आहे. येथील प्लास्टिक खाऊन कित्येक गुरांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.***

# मोकाट गुरांच्या उपद्रवामुळे देवकान्हे गावातील शेतकरी हैराण

## तहसीलदार, पंचायत समिती आणि पशुसंवर्धन खात्याला निवेदन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील देवकान्हे विभागीय शेकरी आणि शेतकरी संघटना यांनी मोकाट गुरांच्या समस्येबाबत स्थानिक प्रशासनाला निवेदन दिले आहे.

गेली अनेक दिवस या उन्नाड आणि मोकाट गुरांच्या उपद्रवामुळे दिवसेंदिवस येथील शेतकरी अक्षरशःपिकांच्या नुकसानीपासून मेटाकुटीला आला आहे तर शेतीतील पिकांची नुकसानी तर ठिकाणी लागवड केलेल्या भाजी पाल्याच्या नुकसानीस ही गुरे कारणीभूत ठरत असल्याने येथील शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करत देवकान्हे, धानकान्हे, चिल्हे, तळवली आणि बाहे येथील शेतकरी ग्रामस्थ एकत्रित येऊन शुक्रवारी २० फेब्रुवारी रोजी सदरील खात्यांना निवेदन दिले.

रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांची समस्या जिथे मोकाट गुरांमुळे शेती, पिकांना आणि सार्वजनिक आरोग्यास त्रास होतो. तब्बल पन्नासहून अधिक ही मोकाट गुरांची टोळी रात्रंदिवस शेत जमीन साऱ्या खलाटीत हैदोस घालत फिरत कुणाची भात शेतीचे पिक तर कोणाचे भाजीपाला पीक तर काहींनी सामूहिक केलेल्या कलिंगड लागवडीस अथवा त्यांच्या व्यवसायाला कारणीभूत ठरत येथील शेतकऱ्यांना त्याचा मोठा आर्थिक फटका बसत असल्याने या निवेदनाचे मुख्य मुद्दे तहसीलदार, पंचायत समिती आणि पशुसंवर्धन खात्यांना मोकाट गुरांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी तसेच त्यांचे मुख्य मालकांवर दंड आकारणे आणि जनावरे पकडून गोशाळेत ठेवण्याची आग्रही मागणी या लेखी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी प्रगतशील शेतकरी रामचंद्र बामणे, धनाजी लोखंडे, राम महाडिक, रघुनाथ कोस्तेकर, धोंडू कचरे, किशोर भोईर, पांडुरंग गोसावी, अरविंद भिलारे, महादेव कचरे, सखाराम कचरे, देवकान्हे पोलीस पाटील दयाराम भोईर, किशोर कान्हेकर, आदी विभागातील शेतकरी आणि शेतकरी संस्थेचे पदाधिकारी यांनी रोहा तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार रावसाहेब राजेश थोरे यांना निवेदन देण्यात आले.



पंचायत समिती रोहा गट विकास अधिकारी शुभदा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दिनेश वारगे सहाय्यक प्रशासक अधिकारी यांना हे निवेदन देण्यात आले तसेच डॉ.प्रमोद नाना गायकवाड, सहाय्यक आयुक्त पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी पंचायत समिती रोहा व डॉ. प्रवीण धुमाळ पशु विकास अधिकारी यांना उपस्थित शेतकऱ्यांनी शेतीच्या पिकांच्या नुकसानीचा पाढा वाचत हे विनंती निवेदन देण्यात आले.

# श्रीवर्धन आगारातील समस्यांबाबत नागरिकांनी घेतली व्यवस्थापकांची भेट

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन आगारात सध्या गाड्यांचे वेळापत्रक कोलमडलेले असून अनेक नियमित मार्गावर चालणाऱ्या गाड्या बंद करण्यात आलेल्या आहेत. याबाबत वर्तमानपत्रातून व विविध माध्यमातून बातम्या सतत प्रसिद्ध होत असल्यामुळे शहरातील जागरूक नागरिकांनी व नवनिर्वाचित नगरसेवकांनी श्रीवर्धन आगाराचे आगार व्यवस्थापक महबूब मणेर यांची भेट घेतली.

श्रीवर्धन आगारातून बंद झालेली श्रीवर्धन अलिबाग ही बस पूर्ववत चालू करण्यात आलेली आहे. तर श्रीवर्धन सातारा ही बस देखील आजपासून सुरू करण्यात आली आहे. याचप्रमाणे मुंबईकडे जाणाऱ्या गाड्या यादेखील अनेक वेळा रद्द केल्या जातात. त्याबाबत आगार व्यवस्थापकांकडे समस्या मांडण्यात आली. त्यावरती आगार व्यवस्थापकांनी सदर गाड्या पूर्ववत सुरू करण्याबाबत आश्वासन दिले. येत्या एक एप्रिल पासून श्रीवर्धन आगारामध्ये सीएनजी पंप सुरू होणार आहे. त्यानंतर श्रीवर्धन आगारात ४० सीएनजी बसेस उपलब्ध होणार आहेत. या बसेस उपलब्ध झाल्यानंतर सर्व मार्गांवरती वेळापत्रकाप्रमाणे गाड्या व्यवस्थितपणे सुरू होतील, असेदेखील आगार व्यवस्थापकांनी सांगितले.



श्रीवर्धन बीड व श्रीवर्धन लातूर या गाड्यांची श्रीवर्धन वासियांना कोणत्याही प्रकारची आवश्यकता नसल्याने या गाड्या कायमस्वरूपी बंद करून फक्त श्रीवर्धन ते पुणे बस सुरू ठेवाव्यात. अशी मागणी प्रवाशांनी ठामपणे केली. जर का या दोन फेऱ्या बंद केल्या नाहीत तर नागरिकांतर्फे आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही आगार व्यवस्थापकांना देण्यात आला आहे. तसेच श्रीवर्धन येथून बऱ्याच गाड्या लांब पल्ल्यासाठी जातात, परंतु त्या बोरली मार्गे जातात अशा गाड्या कमी करून थेट श्रीवर्धनच्या प्रवाशांच्या सोयीसाठी श्रीवर्धन म्हसळा माणगाव मार्गे गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी देखील करण्यात आली.

श्रीवर्धन नगर परिषदेतील माजी नगरसेवक चंद्रकांत भगत, नवनिर्वाचित नगरसेवक देवेंद्र भुसाणे, संतोष वेशवीकर, त्याचप्रमाणे शिवसेना शहर प्रमुख सावन तवसाळकर माजी नगरसेवक व माजी उपनगराध्यक्ष संतोष केळसकर, मुईद सरखोत, मुजीब चोगले, विवेक बंदरकर श्रीवर्धन शहरातील पत्रकार त्याचप्रमाणे असंख्य नागरिक यावेळी उपस्थित होते.

# पळस्पे येथे महामार्ग सुरक्षा पथकाच्या कार्यालयाचे उद्घाटन

## अप्पर पोलीस महासंचालकांच्या हस्ते देवदूत स्वयंसेवकांचा गौरव

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

रस्ते सुरक्षा अभियान २०२६च्या समारोप कार्यक्रमानिमित्त रायगड परिक्षेत्रातील महामार्ग सुरक्षा पथकाच्या पळस्पे येथील नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात झाले. अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य प्रवीण साळुंखे यांच्या हस्ते फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

रायगड परिक्षेत्रात वाढती वाहतूक, सातत्याने घडणारे अपघात आणि प्रशासकीय अडचणी लक्षात घेता स्वतंत्र प्रशासकीय कार्यालयाची गरज भासत होती. संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाची जागा निश्चित करून अतिक्रमण हटवले व आवश्यक प्रशासकीय पाठपुरावा पूर्ण करत हे कार्यालय उभारण्यात यश मिळवले. या उपक्रमामुळे महामार्ग सुरक्षा व्यवस्थेला स्वतंत्र व सक्षम अधिष्ठान प्राप्त झाले आहे.



या कार्यालयामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, वाहतूक नियमन व सातत्यपूर्ण देखरेख, ई-चलान प्रणालीची काटेकोरपणे राबवता येईल, अपघात नियंत्रण व तात्काळ मदत व्यवस्थेचे बळकटीकरण होईल.

कार्यक्रमात अपघातग्रस्तांना मदत करून जीवनदान देणाऱ्या 'देवदूत' स्वयंसेवकांचा, हेल्प फाउंडेशन, सह्याद्री वन्यजीव संरक्षक समिती अशा सामाजिक संस्थां, महामार्गावरील देवदूत यंत्रणा, लोकमान्य हॉस्पिटल, डेल्टा फोर्स, मृत्युंजय देवदूत यांच्यासह कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, पत्रकार, उद्योजक, वाहतूकदार आणि नागरिकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अपघाताच्या क्षणी तत्परतेने धावून जाणाऱ्या या मदतनीसांमुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, उपअधीक्षक पुष्पलता दिघे, पोलीस निरीक्षक भरत शेंडगे, विनोद माळवे, दिपाली जाधव, वैभव रोंगे, पीएसआय देविदास नाईक, पीएसआय संजय टिळेकर तसेच जिल्ह्यातील महामार्ग पोलीस अधिकारी, कर्मचारी, कंटेनर यार्ड प्रतिनिधी, वाहतूकदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पळस्पे येथील नूतन प्रशासकीय कार्यालयामुळे रायगड परिक्षेत्रातील महामार्गांवरील शिस्त, सुरक्षितता आणि प्रतिसाद क्षमता अधिक सक्षम होणार आहे.

# माथेरान पालिकेच्या सभांचे थेट प्रक्षेपण व्हावे -भास्कर शिंदे

**माथेरान : प्रतिनिधी**

राज्यातील विविध ठिकाणी असणाऱ्या नगरपालिका क्षेत्रात ज्यावेळी विविध विषयांवर महत्त्वपूर्ण निर्णय अथवा विकासकामे होण्यासाठी सभा आयोजित करण्यात येते त्याबाबत इत्यंभूत माहिती गावातील जनतेला माहीत व्हावी यासाठी होणाऱ्या सभांचे थेट प्रक्षेपण द्वारे दाखविण्यात येत असते त्याच धर्तीवर माथेरान मध्ये सुध्दा नगरपरिषदेच्या सभागृहात होणाऱ्या सभांचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात यावे, अशी मागणी येथील उद्योजक भास्कर शिंदे यांनी केली आहे.

अनेकदा काही महत्वपूर्ण कामे परस्पर एखाद्या मर्जीतील ठेकेदाराला सुपूर्द केली जातात आणि त्यामागे खुप काही गौडबंगाल दडलेले असते. त्यामुळे होणारी विकासकामे नियोजनशून्य होऊन निधीचा अपव्यय होत असतो. ज्यावेळी सभांचे आयोजन करण्यात येते त्यावेळी चालू सभेत लोकनियुक्त सदस्य अधिकाऱ्यांचे लांगुलचालन तर करीत नाही ना किंवा एखाद्या अधिकाऱ्यांच्या दबावाखाली कोणता सदस्य नाही.

ना याची शहानिशा होण्यासाठी जर का सभागृहात होणाऱ्या सभांचे चित्रण प्रदर्शित केल्यास जनतेचा सुध्दा आत्मविश्वास वाढेल की ज्यांना आपण अमूल्य मत देऊन ज्यांना कार्यक्षम सदस्य समजून सभागृहात पाठवले आहे.

निवडून दिलेले लोकप्रतिनिधी खरोखरच आत्मीयतेने कामे करतात की नाही याचे ज्ञान आणि माहिती प्रत्येक घटकापर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यासाठी आगामी काळात होणाऱ्या प्रत्येक सभांचे थेट प्रक्षेपण करण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे परंतु सत्ताधारी गट काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

काही वर्षांपूर्वीच पालीकेच्या सर्व सभा लाईव्ह केल्या जाव्यात अशी मागणी मी स्वतः तत्कालिन बहुमत असणाऱ्या सत्ताधारी गटाकडे केली होती. नगर परिषदेच्या सर्व सभा लाईव्ह झाल्या पाहिजेत आजही या मागणीवर आम्ही ठाम आहोत.आपले लोकप्रतिनिधीं काय काम करतात,प्रभागाचे,गावाचा हिताचे निर्णय कसे घेतात हे पाहण्याची संधी लाईव्ह सभेमुळे मतदार नागरिकांना भेटू शकते, असे भास्कर शिंदे यांनी सांगितले.

# शिरवली ग्रामपंचायतीला पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत शिरवलीचे सरपंच महेश पाटील व ग्राम पंचायत अधिकारी यांनी माझी वसुंधरा अभियान ५.० हा राज्यस्तरीय पुरस्कार महामहीम राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते मुंबई येथे स्वीकारला. या पुरस्काराने ग्रुप ग्रामपंचायत शिरवली यांचे अभिनंदन होत आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेंतर्गत १ हजार ते १.५ हजार लोकसंख्या गटामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गावांमध्ये शिरवली ग्रामपंचायतीचा राज्यात प्रथम क्रमांक आला, तर याच उपक्रम अंतर्गत भूमी अभियान यशस्वी राबविण्यात आल्याने राज्यात पुन्हा प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने पन्नास लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले. एकूण दीड कोटी रुपये शिरवली यांनी जिंकले.



ग्रामपंचायत शिरवली यांनी केलेल्या या कामगिरीबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि माझी वसुंधरा अभियान संचालनालय यांचे वतीने देण्यात आला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे आदी उपस्थित होते.

माझी वसुंधरा अभियान ५.० सन २०२४-२५मध्ये राबविण्यात आला. उपसरपंच गीता बांदल, विद्यमान ग्राम पंचायत अधिकारी अंकुश पाटील, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी प्रल्हाद पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

# युवासेना लोणेरे विभाग प्रमुखपदी प्रसाद मांजरे

**माणगाव : बातमीदार**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांनंतर संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने युवासेनातर्फे पदाधिकाऱ्यांची फेरबदल करून नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. त्यानुसार लोणेरे युवासेना विभाग प्रमुखपदी प्रसाद मांजरे यांची, तर कुंभारआळी-पहेल येथील युवासेना शाखा प्रमुखपदी नारायण केसरकर यांची निवड करण्यात आली.

या नियुक्त्यांची अधिकृत घोषणा करण्यात येऊन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात घोषणाबाजी करत नव्या पदाधिकाऱ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



नवनियुक्त लोणेरे विभाग युवासेना प्रमुख प्रसाद मांजरे यांनी संघटनेची ताकद वाढवण्यासाठी गावोगावी युवकांना जोडण्याचा संकल्प व्यक्त केला. युवकांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेऊन विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच कुंभारआळी-पहेल शाखा प्रमुख नारायण केसरकर यांनी शाखा स्तरावर संघटन मजबूत करत सामाजिक व विकासात्मक उपक्रम राबविण्याचे आश्वासन दिले.

# लायन्स क्लबतर्फे कॅन्सरग्रस्त मुलांसाठी सहल



**मुरुड : प्रतिनिधी**

येथील लायन्स क्लब ऑफ अलिबाग आणि लायन्स क्लब खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक चाईल्डहूड कॅन्सर डे'च्या औचित्याने लायन्स हेल्थ फाउंडेशन, चोंढी येथील नेत्र रुग्णालयाच्या प्रांगणात कॅन्सर पीडित मुलांची सहल आयोजित केली होती.

६५ मुले आपल्या पालकांसह नाचगाणी, गप्पागोष्टी, फनी गेम्स, विनोद, मनमुराद भटकंतीत रमली. मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर अनिल म्हात्रे यांच्या सौजन्याने फेरीबोटीतून समुद्र सफरीचा तर लायन नयन कवळे यांनी बससेवा उपलब्ध करून संपूर्ण सागरी पट्ट्यावरील फेरफटका मारण्याचा आनंद दिला.

या उपक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून फर्स्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर अनिल जाधव, चाईल्डहुड कॅन्सरचे डीसी देवरतन डागा, अडिल मिस्त्री, शिवकुमार साखरदांडे, लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, सचिव महेश कवळे, खजिनदार अमोघ किंजवडेकर, महेंद्र पाटील, नितीन शेडगे, लायन ऋषी ओबेरॉय, रूपेश मेहता, डॉ.अर्नि बुहारिवाला, शुभांगी कुडतलकर, इतर लायन मेंबर्स, कॅन्सर पीडित मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थेचे कर्मचारी, पीडित मुले आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाकिस्तान, न्यूझीलंडचा पाय खोलात!

## पावसामुळे सामना रद्द झाल्याने वर्ल्डकपमध्ये समीकरण बदलले

**कोलंबो : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात शनिवारी (दि. २१) होणारा सुपर-८चा सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करावा लागला. या सामन्यासाठी राखीव दिवस नसल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. या निकालामुळे आता उभय संघांच्या उपांत्य फेरीच्या प्रवेशाचे गणित अधिकच कठीण झाले आहे.



पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता, मात्र बघता बघता पावसाचा जोर वाढल्याने एकही चेंडू न खेळता सामना रद्द करावा लागला. या सामन्यासाठी पाकिस्तानने संघात एक बदल करत ख्वाजा नफेच्या जागी फखर जमानला संधी दिली होती. दुसरीकडे न्यूझीलंडने तीन बदल केले. पोटाच्या त्रासामुळे मागील सामना न खेळलेला कर्णधार मिचेल सँटनर संघात परतला, तर लॉकी फर्ग्युसन आणि ईश सोधी यांनाही अंतिम अकरामध्ये स्थान मिळाले होते.

पावसामुळे पाकिस्तान आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांची स्थिती सुपर-८ फेरीत अधिक कठीण झाली आहे. कोलंबोतील हवामान पाहता आगामी सामन्यांतही पावसाची शक्यता नाकारता येत नाही. अशा स्थितीत पुढील सामने जिंकणे अनिवार्य असून पराभव किंवा पावसामुळे होणारा निकाल त्यांच्या उपांत्य फेरीच्या स्वप्नाला तडाखा देऊ शकतो. पाकिस्तान आपला पुढचा सामना २४ फेब्रुवारी रोजी इंग्लंडविरुद्ध खेळणार आहे, तर न्यूझीलंड २५ फेब्रुवारीला यजमान श्रीलंकेशी भिडणार आहे.

पावसाचा फटका बसल्यामुळे आता पाकिस्तान आणि न्यूझीलंड हे दोन्ही संघ बॅकफूटवर गेले आहेत. दोन्ही संघांच्या खात्यात आता प्रत्येकी एक गुण जमा झाला आहे. उर्वरित दोन सामने जिंकून हे संघ पाच गुणांपर्यंत पोहचू शकतात. बहुतांशवेळा सुपर-८साठी एवढे गुण पुरेसे ठरतात, पण उर्वरित दोन पैकी एक पराभव म्हणजे स्पर्धेतील प्रवास जवळपास संपुष्टात येईल, कारण एक पराभव आणि एक विजय मिळवला, तर फक्त या दोन्ही संघांना तीन गुणांपर्यंत मजल मारता येईल. या परिस्थितीत या गटात दोन विजय मिळवून चार गुण मिळवणारा संघही त्यांच्या पुढे निघून जाईल. म्हणूनच सेमीचे तिकीट मिळवण्यासाठी दोन्ही संघासाठी उर्वरित प्रत्येक सामना 'करो वा मरो'ची लढत असेल.

# राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

## मुंबईच्या संकेत सावंतकडे नेतृत्व

**मुंबई : प्रतिनिधी**

गुजरात कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने होणाऱ्या ७२व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनने आपला संघ जाहीर केला आहे. मुंबई शहरच्या संकेत सावंतकडे संघाच्या नेतृत्वाची कमान सोपविण्यात आली आहे.

बडोदा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुलात २४ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत हे सामने खेळविण्यात येतील. गतवर्षी कटक (ओडिशा) येथे झालेल्या ७१व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाचा पंजाबकडून उपउपांत्य फेरीत पराभव झाला होता, पण संकेत सावंत याने मुंबई शहर संघाचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर



अहिल्यानगर येथे झालेली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी, जळगाव येथे झालेली छत्रपती शिवाजी महाराज चषक तसेच बारामती येथे झालेली महाराष्ट्र ऑलम्पिक कबड्डी स्पर्धा अशा एका वर्षात तिन्ही स्पर्धेत विजेतेपद मिळवून मुंबईला हॅट्ट्रिक साधून दिली होती. महाराष्ट्रदेखील त्याच्या नेतृत्वाखाली विजेतेपद मिळवेल का हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

संघ : संकेत सावंत (संघनायक, मुंबई शहर), आदित्य शिंदे (उपसंघनायक, अहिल्यानगर), अस्लम इनामदार (ठाणे ग्रामीण), सौरभ राऊत, शिवम पठारे (अहिल्यानगर), सुरेश जाधव, अजित चौहान व अनुज गावडे (पुणे ग्रामीण), दादासो पुजारी, साईप्रसाद पाटील, आदित्य पोवार व सौरभ फागरे (कोल्हापूर), जयेश महाजन (नंदुरबार), अल्केश चव्हाण (छत्रपती संभाजीनगर), प्रशिक्षक रमेश भेंडीगिरी, व्यवस्थापक अक्षय जाधव, फिजिओ पुरुषोत्तम प्रभू.

# न्यूझीलंड दौऱ्यासाठी द. आफ्रिकेचा संघ जाहीर

**केपटाऊन : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप सुपर-८ फेरीतील सामना सुरू होण्यापूर्वीच दक्षिण आफ्रिका क्रिकेट बोर्डाने न्यूझीलंड दौऱ्यासाठी आपला संघ जाहीर केला आहे. या मालिकेसाठी दक्षिण आफ्रिका संघाची जबाबदारी फिरकी गोलंदाज केशव महाराजकडे सोपवण्यात आली आहे.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या द. आफ्रिका संघातील तीन खेळाडूंना वगळता इतर सर्व खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. त्यामुळे केशव महाराजकडे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

वर्ल्डकप स्पर्धा झाल्यानंतर १५ मार्चला दक्षिण आफ्रिका विरुद्ध न्यूझीलंड टी-२० मालिकेला सुरुवात होणार आहे. या मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेच्या संघात केशव महाराजसह फिरकी गोलंदाज जॉर्ज लिंडे आणि अष्टपैलू खेळाडू जेसन स्मिथला संधी देण्यात आली आहे.

द. आफ्रिकेचा संघ : केशव महाराज (कर्णधार), ओटनील बार्टमन, ईथन बॉश, गेराल्ड कोएत्ज़ी, टोनी डी जॉर्जी, कॉनर एस्टरहुइज़न, डियान फॉरेस्टर, जॉर्डन हरमन, रुबिन हरमन, जॉर्ज लिंडे, नकोबानी मोकोएना, एंडिले सिमेलेन, लुथो सिपामला, प्रेनेलन सुब्रायन आणि जेसन स्मिथ.

# क्रिकेटपटू राहुल चाहरचा घटस्फोट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा स्टार फिरकीपटू राहुल चाहरने आपली पत्नी ईशानी जौहरपासून घटस्फोट घेत असल्याची माहिती दिली आहे. याबाबत सोशल मीडिआ अकाऊंटवर चाहरने एक पोस्ट शेअर केली आहे.

या पोस्टमध्ये राहुल चाहरने म्हटलेय की, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आम्ही दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला आहे. राहुल आणि ईशानी या दोघांचा ९ मार्च २०२२चा गोव्यात थाटामाटात विवाह सोहळा पार पडला होता. चार वर्षांचा संसार केल्यानंतर दोघांनी वेगळे होण्याचा निर्णय घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# रन फॉर अ कॉज खारघर मॅरेथॉन

## ईट प्ले रीडचा सहभाग

**पनवेल : वार्ताहर**

रन फॉर अ कॉज खारघर मॅरेथॉन नुकतीच झाली. यावेळी अनेक धावपटू, कलाकारांची, नामांकित सद्गृहस्थांचीही उपस्थिती होती. हे औचित्य साधून ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राजदूतांनी या गौरव सोहळ्यात सहभागी होऊन या अभियानाचा आवाज सर्वसामान्यांपर्यंत पोहचवला.



या उपक्रमात विशेष हजेरी लाभली ती अनेक कलाकारांची. यावेळी अनेक नृत्याविष्कार सादर झाले, जेणेकरून सर्व धावपटूंना ऊर्जा मिळावी. ईट प्ले रीडचा हा उल्लेखनीय प्रयत्न दिसून आला. यावेळी स्पर्धेतील सर्व धावपटूंसोबत राजदूतांनी हितगुज साधला आणि चर्चा केली.

धावपळीच्या जीवनामध्ये पहाटेची शरीरासाठी धाव किती महत्त्वाची आहे यावर प्रत्येकाने आपापले मत व्यक्त केले. सकाळी मनाला मिळणारा उत्साह, शरीराला प्राप्त होणारी ऊर्जा हे सर्व काही धावण्याने मिळते. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीने किमान अर्धा तास तरी धावावे, असे आवाहन करण्यात आले.

# एमसीएच्या क्रिकेट स्पर्धेत रायगड, नाशिक, वायएमसीए संघांचा विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) पुरुषांच्या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या झालेल्या सामन्यात रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन, नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन व वायएमसीए क्रिकेट क्लब पुणे संघानी विजय मिळवला आहे.



बेलापूर येथील सिडकोच्या मैदानावर रायगड विरुद्ध सेंट्रल झोन या संघांमध्ये झालेल्या सामन्यात रायगडच्या संघाने सेंट्रल झोन संघावर एक डाव व ६० धावांनी दणदणीत विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना सेंट्रल झोनच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद १०६ धावा काढल्या. रायगडचा युवा जलदगती गोलंदाज अभिषेक खातू याने आठ फलंदाजांना बाद करत तंबूत धाडले. रायगडच्या संघाने पहिल्या डावात नऊ गडी गमावत ३१२ धावांवर डाव घोषित केला. रायगडचा कर्णधार रवी सोलंकी याने सर्वाधिक ५१, तर श्रेयस कुमारने ४१ धावांची दमदार खेळी केली. पहिल्या डावात रायगडच्या संघाने २०६ धावांची मोठी आघाडी घेतली.

दुसऱ्या डावात सेंट्रल झोन संघाचा डाव अवघ्या १४६ धावांमध्ये आटोपला. रायगडकडून कौस्तुभ म्हात्रे याने चार, आर्यन देशमुखने तीन, तर अभिषेक खातू याने दोन फलंदाज बाद केले. रायगडच्या सामना एक डाव व ६० धावांनी जिंकला.

गव्हाण उलवे येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या सामन्यात नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे संघावर एक डाव व ७५ धावांनी दणदणीत विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना सीडीएच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी गमावत १९१ धावा केल्या, तर नाशिक संघाने पहिल्या डावात धावांचा डोंगर उभा करत सहा गडी गमावत ४२८ धावा काढल्या त्यामध्ये रवींद्र मॅचा याने १४० आणि अभिजित पवारने मधल्या फळीत खेळताना सर्वाधिक १४० धावा काढून शतक झळकवले. दुसऱ्या डावात सीडीएचा संघ १६२ धावांमध्ये आटोपला.

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या सामन्यात वायएमसीएच्या संघाने पहिल्या डावाच्या आघाडीवर क्लब ऑफ महाराष्ट्र संघाचा पराभव करत विजय मिळवला आहे. वायएमसीएच्या संघाने प्रथम फलंदाजी करतांना सर्व गडी बाद २८५ धावा केल्या. त्यामध्ये नित्या लुनकड याने सर्वाधिक १२८ धावा काढून शतक झळकवले. क्लब ऑफ महाराष्ट्रकडून केदार बजाज याने चार गडी बाद केले. या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद २०६ धावा केल्या. वायएमसीएच्या संघाकडून स्वराज वाबळे याने सहा फलंदाज बाद केले.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्यांनी मैदानावर उपस्थित राहून सर्व खेळाडूंना उत्तम कामगिरी केल्याबद्दल अभिनंदन केले आणि पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.

# उलवेमध्ये कबड्डीचा थरार













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com